https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -८० | मंगळवार,दि.२६ नोव्हेंबर २०२४ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-80 | Tuesday, Dt.26 November 2024 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात बीड जिल्ह्याला मिळणार 2 कॅबिनेट आणि 2 राज्यमंत्रीपदे ?

## कॅबिनेट धनंजय मुंडे, पंकजा मुंडे तर राज्यमंत्री म्हणून सुरेश धस, प्रकाश सोळंके यांना मिळणार संधी !

बीड / वैभव स्वामी महाराष्ट्रामध्ये महायुतीचे सरकार कधी स्थापन होणार ? यावर आता राजकीय खलबते सुरू झाली आहेत.निर्विवाद बहुमत मिळालेले असताना देखील मुख्यमंत्री पद कोणाला द्यायचे यावरून वाद विकोपाला जात असल्यामुळे मंत्रिमंडळाचा विस्तार लांबला आहे. मात्र मंत्रिमंडळाच्या विस्तारामध्ये बीड जिल्ह्याचे विद्यमान पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे नाव पहिल्या मंत्रिमंडळाच्या यादीत असेल यात दुमत नाही. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळामध्ये पंकजा मुंडे यांच्यासह आमदार सुरेश धस आणि प्रकाश सोळंके यांच्या नावाला देखील सहमती मिळेल अशी शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे बीड जिल्ह्याला दोन कॅबिनेट आणि दोन राज्यमंत्रीपद मिळण्याची शक्यता असल्याने महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळामध्ये बीड जिल्ह्याच वर्चस्व राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.






**महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका पार पडल्या आहेत. या निवडणुकीमध्ये महायुतीने स्पष्ट बहुमत मिळवत 233 जागेवर अभूतपूर्व यश मिळवले आहे. आता महायुतीला 4 पैकी 4 अपक्ष उमेदवारांनी जाहीर पाठिंबा दिलेला आहे. तर एक रासपाच्या उमेदवाराने देखील आपला पाठिंबा भाजपाला दिलेला आहे**

त्यामुळे चार अपक्ष हे महायुतीला मिळालेले आहेत. महायुतीचे संख्याबळ मजबूत असताना देखील महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण ? यावरून शिंदेंची शिवसेना आणि अजित दादा पवार यांचे राष्ट्रवादी आक्रमक असल्याने मंत्रिमंडळाचा विस्तार थेट 2 डिसेंबर पर्यंत गेला आहे.वास्तविक 26 नोव्हेंबर पर्यंत महाराष्ट्राच्या नवनिर्वाचित आमदारामधून नवनिर्वाचित मुख्यमंत्र्यांनी शपथविधी घेत आपल्या मंत्रिमंडळाचा विस्तार करणे अपेक्षित होते. मात्र तसे झाले नाही. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर शिंदेंच्या शिवसेनेने एकनाथराव शिंदे यांची वर्णी लागावी असा आग्रह धरला आहे. तर सर्वाधिक आमदार हे भारतीय जनता पार्टीचे निवडून आल्यामुळे देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असावेत असा आग्रह भाजपाने उघडपणे धरलेला आहे. अजित पवार गटाने मात्र आपली भूमिका सौम्य घेतली असून महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस झाले तर आम्हाला त्याबद्दल काहीही म्हणणे नाही मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदारांनी अजित दादा पवार हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले तर आम्हाला आनंद होईल अशी सावध भूमिका घेतलेली आहे. एकूणच मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण असेल ? यावरून महायुतीमध्ये स्पष्ट बहुमत असताना देखील अंतर्गत कलह वाढलेला आहे. हे नाकारून चालणार नाही. यावर सत्तेच्या लाभापोटी लवकरच एकमत होईल आणि महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाची शपथ देवेंद्र फडणवीस घेतील अशी शक्यता नाकारता येत नाही. महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे हे भविष्यात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून कार्यरत राहतील.त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजित पवार हे देखील महाराष्ट्राचे दुसरे उपमुख्यमंत्री राहतील देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली स्थापन होणाऱ्या मंत्रिमंडळामध्ये बीड जिल्ह्यातून चार नेत्यांना मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे. यामध्ये महाराष्ट्राचे कृषिमंत्री बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे हे परळी विधानसभा मतदारसंघातून ऐतिहासिक 1 लाख 40 हजार मताचे मताधिक्य घेत विजयी झाल्यामुळे ते मंत्रिमंडळाच्या पहिल्या यादीमध्ये कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतील यात शंका नाही. भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांना देखील कॅबिनेट मंत्री म्हणून संधी मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.मात्र पंकजा मुंडे यांच्या पक्ष निष्ठेवर त्यांच्याच बीड जिल्ह्यातील आष्टी आणि परळी या दोन विधानसभा मतदारसंघातूनच थेट आक्षेप घेण्यात येत असल्यामुळे त्यांना सहज मिळणारे मंत्रिपद आता अडचणीत सापडण्याची शक्यता नाकारता येत नाही. आष्टी मध्ये भारतीय जनता पार्टीचे विजयी उमेदवार सुरेश धस यांनी पंकजा मुंडे यांच्यावर थेट आरोप करत मला पराभूत करण्यासाठी पंकजा मुंडे यांनी प्रयत्न केले. त्यांची ही भूमिका पक्षविरोधी ठरली, त्यानी स्वतः ही खंत व्यक्त केल्याने भारतीय जनता पार्टी आता पंकजा मुंडे यांना मंत्रीपद द्यावे की नाही यावर विचार मंथन करत आहे ? त्यामुळे त्यांना पहिल्याच मंत्री पदाच्या यादीमध्ये मिळणारी संधी मिळेल की नाही ?याबद्दल आता शंका निर्माण झाली आहे. मात्र महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळामध्ये पाचव्यांदा निवडून आलेले सर्वांनी पराभूत करण्यासाठी विव्हरचना आखून देखील विजयी झालेले सुरेश धस यांना राज्यमंत्रीपद मिळेल यात शंका नाही. त्याचबरोबर माजलगाव मतदार संघातून चौथ्यांदा निवडून आलेले ज्येष्ठ आमदार प्रकाश दादा सोळंके यांना देखील राज्यमंत्रीपद मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे बीड जिल्ह्याला दोन कॅबिनेट आणि दोन राज्यमंत्रीपद मिळण्याची शक्यता असल्याने बीड जिल्ह्याचा बोलबाला महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात राहील यात शंका नाही.

## डॉक्टर योगेश क्षीरसागर यांना सुवर्णसंधी



बीड विधानसभेत मध्ये जाण्याची संधी डॉक्टर योगेश क्षीरसागर यांची थोडक्यात हुकली. त्यांनी शर्तीचे प्रयत्न केले मात्र आमदार होण्याची पहिलीच संधी त्यांची थोडक्यात गेली. मात्र धनंजय मुंडे यांनी डॉक्टर योगेश क्षीरसागर यांना आपल्या सोबत मुंबईला नेले. पक्षाचे नेते अजितदादा पवार यांच्यासह पक्षातील सर्व पक्षश्रेष्ठींची आपल्या सोबत भेट घडवून दिली आणि डॉक्टर योगेश क्षीरसागर यांना या दुःखातून उभारी देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे धनंजय मुंडे भविष्यात डॉक्टर योगेश क्षीरसागर यांच्यावर मोठी जबाबदारी देतील ती जबाबदारी निश्चितच आमदारासारखी असेल आणि त्यांना बीड विधानसभा मतदारसंघांमध्ये अधिक पोषक काम करता येईल अशी शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे डॉक्टर योगेश क्षीरसागर यांनी देखील आपला पराभव मान्य करून पुन्हा नव्या जोमाने कामाला लागल्याचे दिसून येत आहे.

# पिपाणीमुळे तुतारीचे वाजले बारा

## चिन्हाच्या घोळामुळे शरद पवार गटाचे 9 उमेदवार पडले

राज्यातील विधानसभा निवडणुकीचे संपूर्ण निकाल हाती आले आहेत. पुन्हा एकदा राज्यात महायुतीचंच सरकार आलं आहे. राज्यात महायुतीला सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत. तर महाविकास आघाडीला सर्वात कमी जागा मिळाल्या आहेत. या निवडणुकीत काँग्रेसला 16, उद्धव ठाकरे गटाला 20, शरद पवार गटाला 10 जागा मिळाल्या. तर भाजपला 132, शिंदे गटाला 57 आणि अजितदादा गटाला 41 जागा मिळाल्या. राज्यात आणि महायुतीत भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला. तर महाविकास आघाडीत ठाकरे गट सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. मात्र, यातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे चिन्हाच्या घोळाचा या निवडणुकीतही शरद पवार गटाला मोठा फटका बसला आहे. शरद पवार गटाचे उमेदवार नऊ ठिकाणी पडल्याचं दिसून आलं आहे.

पिपाणी आणि तुतारी या चिन्हांमध्ये मतदारांचा घोळ झाला. त्यामुळे जिंतूर, घनसावंगी, शहापूर, बेलापूर, अणुशक्तीनगर, आंबेगाव पारनेर, केज, परांडा या नऊ मतदारसंघात शरद पवार गटाचे उमेदवार पडले. विशेष म्हणजे या उमेदवारांचा जेवढ्या मतांनी पराभव झाला, त्यापेक्षा जास्त मते पिपाणीला मिळाली आहेत. यावरून मतदारांनी पिपाणीलाच तुतारी समजून मतदान केल्याचं दिसून आलं आहे. हा घोळ झाला नसता तर शरद पवार गटाच्या आमदारांची संख्या नऊने वाढली असती.

जिंतूर -जिंतूर विधानसभा मतदारसंघात शरद पवार गटाचे विजय भांबळे उभे होते. त्यांचा 4516 मतांनी पराभव झाला. या ठिकाणी पिपाणीला 7430 मते मिळाली. त्यामुळे भाजपच्या मेघना बोर्डीकर या विजयी झाल्या.

घनसावंगी- घनसावंगीत शरद पवार गटाचे राजेश टोपे हे 2309 मतांनी पराभूत झाले. या ठिकाणी पिपाणीला 4830 मते मिळाली. शिंदे गटाचे हिकमत उढाण हे विजयी झाले.

शहापूर- शरद पवार गटाकडून शहापूरमधून लढणारे पांडुरंग बरोरा यांनाही फटका बसला. बरोरा यांचा 1672 मतांनी पराभव झाला. या ठिकाणी पिपाणीला 3892 मते मिळाली. परिणामी अजितदादा गटाचे दौलत दरोडा हे विजयी झाले.

बेलापूर - बेलापूरमध्येही अटीतटीची लढत झाली. शरद पवार गटाचे संदीप नाईक यांचा अवघ्या 377 मतांनी पराभव झाला. या ठिकाणी पिपाणीला 2860 मते पडली. त्यामुळे भाजपच्या मंदा म्हात्रे या विजयी झाल्या.

अणुशक्तीनगर- अणुशक्तीनगरमध्येही टफफाईट झाली. शरद पवार गटाचे फहाद अहमद यांचा 3378 मतांनी पराभव झाला. या ठिकाणी पिपाणीला 4075 मते मिळाली. त्यामुळे अजितदादा गटाच्या सना मलिक विजयी झाल्या.

आंबेगाव- आंबेगावात शरद पवार गटाच्या देवदत्त निकम यांना पिपाणीचा फटका बसला. देवदत्त निकम यांचा 1523 मतांनी पराभव झाला. या ठिकाणी पिपाणीला 2965 मते मिळाली. या ठिकाणी अजितदादा गटाचे दिलीप वळसे पाटील विजयी झाले.

पारनेर-पारनेरमध्ये शरद पवार गटाच्या राणी लंके यांचा पराभव झाला. राणी लंके यांचा 1526 मतांनी पराभव झाला. या मतदारसंघात पिपाणीला 3582 मते मिळाली. त्यामुळे अजितदादा गटाचे काशिनाथ दाते विजयी झाले.

केज- केजमध्येही पिपाणीचा शरद पवार गटाला मोठा फटका बसला. पृथ्वीराज साठे यांचा 2687 मतांनी पराभव झाला. या ठिकाणी पिपाणीला 3559 मते मिळाली. या ठिकाणी भाजपच्या नमिता मुंदडा विजयी झाल्या.

परांडा-परांडा येथे शरद पवार गटाच्या राहुल मोटे यांना पराभव स्वीकारावा लागला. त्यांना अवघ्या 1509 मतांनी पराभूत व्हावं लागलं. या ठिकाणी पिपाणीला 4446 मते मिळाली. त्यामुळे शिंदे गटाच्या तानाजी सावंत यांचा विजय सोपा झाला.

# मोकाट कुत्र्यांच्या त्रासामुळे नागरिकांची झोपमोड

परळी / प्रतिनिधीपरळी शहरात मोठ्या प्रमाणावर श्वानांची वाढ झाली असून रस्त्यावर जत्थ्थेच्या जत्थ्थे फिरत आहेत. काही दिवसांपूर्वी पिसाळलेल्या एका श्वानाने तब्बल ४५ जणांना चावा घेतला होता. त्यामुळे मोकाट फिरणाऱ्या श्वानांची दहशत निर्माण झाली आहे.रात्री बे रात्री हे मोकाट जनावर इव्हळत असल्याने नागरिकांची झोप मोड होत असून याकडे नगरपालिकेने लक्ष देण्याची मागणी नागरीकांनी केली आहे.परळी शहरात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर श्वानांची वाढ झाली असून रस्त्यावर जत्थ्थेच्या जत्थ्थे फिरत आहेत. या मोकाट फिरणाऱ्या श्वानांची नागरिकांमध्ये मोठी दहशत निर्माण झाली आहे काही दिवसांपूर्वी वैद्यनाथ



मंदिर परिसरात मोकाट फिरणाऱ्या पिसाळलेल्या एका श्वानांने लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिकांसह तब्बल ४५ जणांना चावा घेतला होता. तेव्हापासून शहरात मोकाट फिरणाऱ्या श्वानांची दहशत निर्माण झाली आहे. शहरात सर्व प्रमुख रस्त्यावर पोका संख्येने पवानांचे जत्थे फिरत असून रात्री बे रात्री ओरडणं , इव्हळन यामुळे शहरातील नागरिकांनी झोप मोड होत आहे.या मोकाट श्वानांचा बंदोबस्त करण्याची आवश्यकता असून या पूर्वी नगरपालिका उपाययोजना करत होती. पण गेल्या काही वर्षापासून नगरपालिकेने याकडे दुर्लक्ष केले आहे. त्या उपाययोजना पुन्हा सुरू करून लहान मुलांसह, महिला, नागरीकांना होणाऱ्या त्रासातून मुक्तता व्हावी अशी मागणी होत आहे.

# शिरूर तालुक्यात आ.पंकजा मुंडे समर्थकांच्या अनेक गावात कमळा पेक्षा शिट्टी ला जादा मतदान

शिरूर ( प्रतिनिधी ) आष्टी-पाटोदा-शिरूर कासार विधानसभा मतदार संघामध्ये भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव असलेल्या आ.पंकजा मुंडे यांच्या समर्थकांनी भाजपचे उमेदवार सुरेश धस यांच्याविरुद्ध केवळ प्रचारच केला नाही तर ओबीसी फॅक्टरच्या नावाखाली शिरूर तालुक्यातील काही गावांमध्ये अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांना अधिकचे मताधिक्य मिळवून दिल्याचे मतदान केंद्र निहाय झालेल्या मतदानातून स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील डोंगरपट्ट्यामध्ये आ. पंकजा मुंडे यांच्या समर्थकांचा मोठा प्रभाव आहे त्याच गावांमध्ये भा.ज.पा. उमेदवार सुरेश धस यांच्याशी म्हणजे पर्यायाने भा.ज.प.पक्षाशी देखील बेईमानी करण्यात आली आहे आणि अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांची शिट्टी वाजवली आहे आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघातील चुरशीच्या निवडणुकीमध्ये भाजपचे उमेदवार सुरेश धस हे मोठी आघाडी घेतील अशी चर्चा सर्वत्र रंगत होती. तसे पाहता सुरेश धस यांना तीन ही तालुक्यामध्ये चांगली मते मिळतील आणि भा.ज.प.चे उमेदवार सुरेश धस निवडून येतील असे एकीकडे ठामपणे सांगितले जायचे. तर दुसरीकडे भाजप पक्षातूनच लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाचा बदला घ्यायचा यासाठी काही फितूर लोकांकडून सुरेश धस यांना पाडण्यासाठी ओबीसी फॅक्टर च्या नावाखाली मोठे षडयंत्र रचले जात होते.यामध्ये आ.पंकजा मुंडे यांचे समर्थक म्हणणारे जि.प.सदस्य रामदास बडे, रामराव खेडकर, प्रकाश बडे, देविदास गर्कळ,ज्ञानदेव केदार आदी भाजप कार्यकर्त्यांचा समावेश असल्याचे दिसून आले आहे. वरील या कार्यकर्त्यांनी खुलेआम पणे आम्ही ताईचे समर्थक आहोत आम्हाला भाजपचे काही घेणे नाही. आपला उमेदवार म्हणजे भीमराव धोंडे हे आहे असा प्रचारही केला. या सर्व षडयंत्राची भनक उमेदवार सुरेश धस यांना लागली होती. सुरेश धस यांचा निवडणुकीत दणदणीत विजय झाल्या नंतर विजयी सभेमध्ये त्यांनी या सर्व गोष्टीची खदखद आपल्या भाषणातून व्यक्त केली होती. याच विरोधी टोळीने धस यांच्या भाषणाचा विपर्यास करून समाजाची दिशाभूल केली. निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर आलेल्या मतदान यादीनुसार शिरूर कासार तालुक्यातील तडगव्हाण, राळेसांगवी, घोगस पारगाव, श्रीपतवाडी ,पारगाव ,मानुर, वारणी, लोणी, बारगजवाडी ,बडेवाडी, जाटवड, पिंपळनेर या गावामध्ये आ.पंकजाताई मुंडे समर्थकाचा मोठा प्रभाव असताना त्या ठिकाणी मतदान भाजपचे उमेदवार सुरेश (अण्णा )धस यांच्या विरोधात गेले कसे? आणि कोणाच्या आदेशावरून अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांच्या पारड्यात पडले आहे. यावरून असे स्पष्ट होते आ. पंकजाताई मुंडे यांच्यावरील या समर्थकांनी आपापल्या गावांमध्ये आणि परिसरामध्ये ओबीसी फॅक्टर च्या नावाखाली अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांना मोठी लिड मिळवून दिली आहे. निवडणूक प्रचारादरम्यान पंकजा मुंडे समर्थक यांच्याकडून सुरेश धस हा देवेंद्र फडवणीस यांचा उमेदवार असल्याचे सांगून त्यांच्या विरोधात प्रचार यंत्रणा राबवण्यात आली होती यामुळे या प्रचाराचा सर्वाधिक फायदा बंडखोर उमेदवार भीमराव धोंडे यांना झाला



संपादकीय

## उजव्यांचे समाजवादी रक्षाबंधन!

''समाजवादाची समस्या ही की कधी ना कधी इतरांचे पैसे संपतात '', असे मार्गारेट थॅचर म्हणत. इतरांच्या पैशावर चालणारे धर्मार्थ कार्य म्हणजे समाजवाद असा त्याचा अर्थ. 'याचे काढायचे आणि त्याला द्यायचे' अशा अर्थाचा इंग्रजी वाक्प्रचारही हेच सांगतो. सरकारचे असे काही नसते; ते फक्त एका वर्गाकडून काढून घेते आणि त्याच्या मते गरजू वर्गास देते. दोन ताजे विधानसभा निवडणुकांचे निकाल या वास्तवाचे स्मरण करून देतात. पहिला अर्थातच महाराष्ट्रातील आणि दुसरा झारखंड या 'बिहारी'वळणाच्या राज्यातील.

या दोन्ही राज्यांत विधानसभा निवडणुका झाल्या आणि महाराष्ट्रापेक्षा कित्येक पटींनी लहान असलेल्या झारखंडात त्या दोन टप्प्यांत घेतल्या गेल्या. ते का यास काही उत्तर नाही. असो. महाराष्ट्रात भाजप सत्तेवर होता आणि झारखंडात तो सत्तेच्छू होता. महाराष्ट्रात अडीच वर्षांपूर्वी जे भाजपने केले ते झारखंडात तो अद्याप तरी करू शकलेला नाही. शिवसेना, राष्ट्रवादीचे अनेक नेते चौकशी यंत्रणांच्या नुसत्या निमंत्रणाच्या शक्यतेने गळपटले आणि भाजपवासी झाले. पण झारखंड मुक्ती मोर्चाचे हेमंत सोरेन या मर्द मराठे म्हणवणाऱ्यांपेक्षा खरे शूर. ते तुरुंगात गेले, केंद्रीय यंत्रणांच्या आडून लढणाऱ्या भाजपशी त्यांनी दोन हात केले आणि पुन्हा विजयी झाले. महाराष्ट्राच्या तुलनेत कित्येक पट विखारी प्रचार त्या राज्यात झाला. कोणत्याही तऱ्हेने सीमावर्ती राज्य नसूनसुद्धा 'बिहारी घुसपेठियां'चा बागुलबुवा उभा करण्याचा अकारण प्रयत्न झाला. पण राजकीय शहाणीव असलेले झारखंडीय बधले नाहीत. त्यांनी स्थानिक सोरेन यांच्याच बाजूने निर्णायक कौल दिला. याचा अर्थ धर्माच्या आधारे दुभंग निर्माण करण्याचा,'एक है तो सेफ है' हे स्वघोषित तत्त्व धर्माच्या मुद्द्यावर सोयीस्कररीत्या वापरण्याचा प्रयत्न यशस्वी होतोच असे नाही. म्हणून महाराष्ट्रातील विजयाचे सारे श्रेय 'बटेंगे तो कटेंगे'स देण्याची गल्लत करण्याचेही कारण नाही. एकाच वेळी होऊनही या दोन राज्यांचे निकाल परस्पर विरोधी लागले. तरीही या दोन्ही निकालांत एक समान सूत्र दिसते.

'लाडकी बहीण' हा तो समान धागा. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांप्रमाणे झारखंडच्या सोरेन यांनीही त्यांची 'मैया योजना' राबवली. महाराष्ट्राचा या अशा सार्वजनिक धनवाटपाच्या योजनांचा हा पहिलाच अनुभव. झारखंडात मात्र २०११ पासून या अशा योजना सुरू आहेत. अलीकडच्या काळात या लाडक्या बहिणींना राजकीय व्यवहारात केंद्रस्थानी आणले ते मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी. या लाडक्या बहिणींनी चौहान यांची हरत असलेली निवडणूक जिंकून दिली. महाराष्ट्र आणि झारखंड या दोन्हीही राज्यांनी चौहान यांचे अनुकरण केले आणि या दोघांनाही चौहान यांच्या प्रमाणे लाडक्या बहिणींनी विजयी केले. आगामी काळात दिल्ली, बिहार अशा राज्यांत निवडणुका होऊ घातल्या आहेत. राजधानी दिल्लीतील श्रावणबाळ अरविंद केजरीवाल या निमित्ताने अशा आणखी काही योजनांस 'आप'लेसे करतील. झारखंडचे मूळ राज्य असलेल्या बिहारचे नितीश कुमार हे तर या अशा नौटंकीचे नटसम्राट. तेही अशा योजना आणतील. मग उत्तर प्रदेश. त्या राज्याचे मुख्यमंत्री आदित्यनाथ योगी असल्याने ते बहनांसाठी बरेच काही करतील. म्हणजे पुढील काळात लोकानुनयाची स्पर्धा अधिकाधिक तीव्र होत जाईल. एकदा का निवडणुकीय यश हे आणि हेच उद्दिष्ट ठेवले की ते साध्य करण्यासाठी आर्थिक आणि अन्यही शहाणपणांस तिलांजली देणे ओघाने आलेच.

हा सरकारी समाजवाद. शेतकरी कर्जमाफी, अन्नसुरक्षा कायदा इत्यादी मार्गांनी हा समाजवाद याआधीही प्रत्यक्षात आणला जात होताच. मुक्त भांडवलशाहीचे खंदे पुरस्कर्ते आणि अभ्यासू भाष्यकार मनमोहन सिंग हे जेव्हा पंतप्रधानपदी होते तेव्हाही त्यांची भाषा आर्थिक उजवी होती तरी वाटचाल मात्र डावीकडचीच होती. त्यानंतर नरेंद्र मोदी यांची कारकीर्द सुरू झाली. मोदी आणि त्यांचे सवंगडी हे नेहरूवादी समाजवादाचे कडवे टीकाकार. जे जे नेहरू-स्पर्शित ते ते या सर्वांसाठी अस्पृश्य. तथापि नेहरूंच्या आर्थिक समाजवादाचे सच्चे अनुयायी हे मोदीच ठरतात हे त्यांच्या गेल्या दहा वर्षांतील धोरणांवरून लक्षात यावे.

# २६ नोव्हेंबर - संविधान सन्मान दिन
# संविधानातून झाली... लोकशाहीची मुहूर्तमेढ

भारताला स्वातंत्र्य मिळालं खरं,पण ते प्राप्त करण्यामागे अनेकांचे बलिदान-त्याग अन् अविश्रांत परिश्रम होतं.युगपुरुष महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली अहिंसा व सत्याग्रहाच्या मार्गाने लढा दिला,तर क्रांतीवीर भगतसिंग,नेताजी सुभाषचंद्र बोस,वीर सावरकरसारख्या शूरवीरांनी जहाल विचारांची कास धरून इंग्रजांशी सामना केला.अखेर १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळालं अन् ब्रिटिश राजवट संपुष्टात आली.

तथापि,स्वतंत्र देशाचा राज्यकारभार सनदशीर मार्गाने चालविण्यासाठी

राज्यघटना तयार करणं क्रमप्राप्तच ठरते.अर्थातच देशाच्या राज्यकारभाराला दिशा दाखविणारा सर्वोच्च कायदा (इरीळल ङरु) म्हणजे राज्यघटना होय. नवराष्ट्राची वाटचाल कशी व्हावी;तेथे कशाप्रकारे शासन असावे;कार्यकारी मंडळ,कायदेमंडळ,न्याय मंडळ यांचे अधिकार व कार्य प्रणाली कशी असावी;राष्ट्रपती,उपराष्ट्रपती,पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळ;तसेच राज्यपाल,मुख्यमंत्री व त्यांचे मंत्रिमंडळ यांचे अधिकार व कर्तव्य कोणते; नागरिकांचे मूलभूत अधिकार,त्यांच्या रक्षणाची हमी व नागरिकांची कर्तव्ये यासंबंधी मार्गदर्शन करणारा मूलभूत कायदा म्हणजे राज्यघटना होय.

या पार्श्वभूमीवर राज्यघटना तयार करण्यासाठी घटना समितीची स्थापना करण्यात आली.डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी या समितीचे अध्यक्षपद भूषवून,त्यांनी एक मसुदा समितीची नियुक्ती केली.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करत त्यात विविध क्षेत्रातील काही निवडक तज्ज्ञ मान्यवरांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.मसुदा समितीचे अध्यक्ष भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी विविध देशांचे दौरे करून तेथील राज्यघटनांमधील तरतुदींचा अभ्यास केला.याशिवाय देशांतर्गत विविध राज्यांच्या भाषा,भौगोलिक परिस्थिती व संस्कृतीची माहिती संकलित करण्यासाठी राज्यांचा अभ्यास दौराही केला.प्रत्यक्षात या कामास २९ ऑगस्ट १९४७ रोजी सुरुवात झाली अन् सदर काम २ वर्षे ११ महिने १८ दिवस अविरत सुरू राहिले. यात ४१३ कलमे व १२ परिशिष्टे यांचा समावेश करण्यात आला.

अखेर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समितीचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसाद यांना सुपूर्द केल्यानंतर ती लगेचच

स्विकृत करण्यात आली.त्यानंतर २६ जानेवारी १९५० पासून राज्यघटना अमलात येऊन भारत देश सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य म्हणून नावरूपाला आला.आणि त्याच दिवसापासून स्वतंत्र भारताची राज्यघटना अमलात आली,अन् हिंदुस्थानाने एका नव्या युगात प्रवेश केला.या नवनिर्मित राज्यघटनेच्या माध्यमातून सर्वधर्मीय नागरिकांना मतदानाचा आणि अन्य मूलभूत अधिकार बहाल करण्यात आले.वास्तवात हीच हिंदुस्थानात संसदीय लोकशाहीची खऱ्या अर्थाने मुहूर्तमेढ ठरली.

भारतीय राज्यघटनेची निर्मिती केल्याबद्दल घटना समितीचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचं अभिनंदनपर आभार मानले.याप्रसंगी राष्ट्रीय काँग्रेसच्या महासभेला संबोधित करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की,राज्यकर्त्यांनी देशाशी प्रामाणिक राहून भारताचे सार्वभौमत्व,एकता व अखंडता टिकवून ठेवण्यासाठी भरीव योगदान द्यावे.तसेच भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र असल्याने प्रत्येक जाती-धर्माविषयी समान आदरभाव असावा.प्रजासत्ताक राज्य निर्मितीसाठी राजकीय लोकशाहीला सामाजिक व आर्थिक लोकशाहीची जोड द्यावी.राज्यघटना,राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा राज्यकर्त्यांसह नागरिकांनी सदैव आदर करावा.आपल्या पसंदीचा लोकप्रतिनिधी निवडून देण्यासाठी राज्यघटनेने सर्वधर्मियांना मतदानाचा अधिकार बहाल केला आहे.कुठल्याही नागरिकांवर अन्याय झाल्यास त्याला न्यायालयात दाद मागण्याचा मूलभूत अधिकार देण्यात आला आहे.

प्रत्येक भारतीय नागरिकाला आपल्या श्रद्धेनुसार आपल्या दैवताची उपासना करण्याकरिता धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार प्रदान करण्यात आला.तथापि,राज्य हे कोणत्याही धर्माशी घटनात्मकदृष्ट्या बांधील नाही वा कुठल्याही धर्मात हस्तक्षेप करत नाही.याशिवाय कुठल्याही विषयावर आपले मत व्यक्त करण्यासाठी नागरिकांना घटनेने विचार स्वातंत्र्याचा अर्थातच अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार दिला आहे.तथापि,विचार स्वातंत्र्याचा वापर करताना इतरांच्या मूलभूत अधिकारांची पायमल्ली होणार नाही,याची प्रत्येकाने खबरदारी घ्यावी.महत्वाचे म्हणजे आपला उदरनिर्वाह करण्यासाठी नागरिकांना उद्योग-व्यवसाय,नोकरी करण्याचा अधिकारही बहाल करण्यात आला. स्त्री-पुरुष,गरीब- श्रीमंत,स्पृश्य- अस्पृश्य,कामगार-मालक असा भेदाभेद न करता,भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांना समान अधिकार-समान संधी प्रदान केली आहे.अत: वरील बाबींकडे पाहिल्यास संसदीय लोकशाही ही खऱ्या अर्थाने आदर्श राज्यपद्धती आहे,हे सिद्ध होते.

घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित भारतीय घटनेत विविध प्रवर्गातील मागासवर्गियांना राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या नोकऱ्यांमध्ये आरक्षण दिलं.इतकेच नव्हे तर,मागास वर्गीय जाती-जमाती, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक,अपंग व्यक्तींच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना शैक्षणिक व आर्थिक सवलती,सोयी-सुविधा घटनेच्या माध्यमातून प्रदान करण्यात आल्या. हॉटेल्स,सार्वजनिक करमणुकीची स्थळे,धार्मिक ठिकाणे येथे भेदाभेद न करता,प्रत्येकाला प्रवेश देण्यात आला. अस्पृश्यता पाळणे हा फौजदारी गुन्हा आहे,असे कायद्यात नमूद करण्यात आले.घटनेच्या माध्यमातून घटनाकारांनी विविध संप्रदाय, भाषा,पंत,संस्कृती-परंपरा असलेल्या देशात विविधतेतून एकता प्रस्थापित करण्यावर अधिक भर दिला.त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राज्यघटनेतून निर्मित संसदीय लोकशाही ही सर्वधर्मियांसाठी अन् समाजामधील सर्वच वर्गांतील नागरिकांसाठी वरदान ठरली आहे.




प्रत्येक नागरिकाने देशाप्रती कर्तव्याची जाणीव ठेऊन भारताचे सार्वभौमत्व,अखंडता व एकात्मता यांचे रक्षण करणे;सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे;सांस्कृतिक वारसाचे जतन करणे;अरण्य,सरोवर,नद्या, वन्यजीवसृष्टी या नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणे;राष्ट्रीय एकात्मतेची जोपासना करणे आणि वेळप्रसंगी देश रक्षणाच्या कामी भरीव योगदान देणे,ही मूलभूत कर्तव्ये पार पाडावीत,असे नागरिकांकडून अभिप्रेत आहे,हा मोलाचा सल्ला घटनाकारांनी नागरिकांना दिला आहे.तात्पर्य,प्रत्येक नागरिकाने भारतीय प्रजासत्ताकाचा सन्मान करून त्याला अधिक मजबूत करण्यासाठी कटिबध्द व्हावे.त्यासह त्याचे नावलौकिक वाढेल यासाठी सदैव प्रयत्नशील रहावे,म्हणजे संविधान सन्मान दिन साजरा करणे खऱ्या अर्थानं सार्थक ठरेल.देशातल्या सर्वधर्मीय नागरिकांना संविधान सन्मान दिन च्या हार्दिक शुभेच्छा!भारतीय संविधान चिरायू होवो!

जय हिंद! जय महाराष्ट्र!

लेखक - रणवीरसिंह राजपूत
गवर्नमेंट मिडिया,महाराष्ट्र शासन
(मो.न.९९२०६७४२१९)



गेवराई - गेवराई मतदार संघाच्या आमदारपदी विजयसिंह पंडित यांची निवड झाली.या निवडीचे शिल्पकार माजी आमदार अमरसिंह पंडित यांना शुभेच्छा देऊन अभिनंदन करते वेळेस सावता परिषदचे गेवराई तालुका अध्यक्ष दादासाहेब चौधरी, गणेश काशिद, ब्रह्मदेव चौधरीसह आदी.



मुंबई - भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या अभूतपूर्व यशाबद्दल आमदार सुरेश अण्णां धस यांनी अभिनंदन केले.बावनकुळे साहेब यांनी पाचव्यांदा आष्टी विधानसभा आमदारपदी सुरेश आण्णा धस यांची निवड झाल्याबद्दल अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी समवेत चिंचवड विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार शंकरशेठ जगताप उपस्थित होते.



**बीड /प्रतिनिधी**

**पुण्यातील चिंचवड विधानसभा मतदार संघातून विजयी झालेले भाजपचे नवनियुक्त आमदार शंकर जगताप यांचा विशाल नगर येथे रविवारी सत्कार करण्यात आला. यावेळी भाजप नेते सचिन साठे, भारतीय खाद्य निगमचे सदस्य अनिल संचेती, सतीश गायकवाड, प्रभाकर न्यालकंटी , सचिन पवार, बाबुलाल बधाई , रोशन तातेड , संजय लबरू आदी उपस्थीत होते.**


## जाहीर प्रगटन

**मा. श्रीम. डी. के. पाटील साहेब ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज १६९२/२०२४**
**जान्हवी व इतर विरुध्द निरंक**
**ॲड. कुलकर्णी ए. एस.**

अर्जदार :- १) जान्हवी भ्र. मंगेश बोबडे, वय: ३० वर्षे, धंदा: घरकाम, रा. अयोध्यानगर, बहिरवाडी ता. जि. बीड

२) विश्वजीत पि. मंगेश बोबडे, वय: १० वर्षे, धंदा: शिक्षण, रा. अयोध्यानगर, बहिरवाडी ता. जि. बीड अ.पा.क. अर्जदार नं. १ जान्हवी बोबडे

३) युध्दजित पि. मंगेश बोबडे, वय: ०६ वर्षे, धंदा शिक्षण, रा. अयोध्यानगर, बहिरवाडी ता. जि. बीड अ.पा.क. अर्जदार नं. १ जान्हवी बोबडे

४) पुष्पा भ्र. बाळासाहेब बोबडे, वय: ५० वर्षे, धंदा: घरकाम, रा. अयोध्यानगर, बहिरवाडी ता. जि. बीड

विरुद निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत....

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे मंगेश पि.बाळासाहेब बोबडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत नामे मंगेश पि.बाळासाहेब बोबडे रा. अयोध्यानगर, बहिरवाडी, बीड ता जि. बीड यांचा मृत्यु दिनांक : ०३.११.२०२४ रोजी अयोध्यानगर, बहिरवाडी, बीड ता. जि. बीड येथे झाला. अर्जदार क्रं. १ ही मयताची पत्नी आहे. तसेच अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क्र. २ व ३ हे अज्ञान असून त्यांची अ.पा.क. आई अर्जदार क्र. १ ही आहे. तसेच अर्जदार क्र. ४ ही मयताची आई आहे. मयताचे वडील या पुर्वीच मयत झालेले आहेत. मयतास सदर अर्जदारांशिवाय इतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत मंगेश पि.बाळासाहेब बोबडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २५/ ११ / २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक ०२/०१/२०२५.

**क. लिपीक**

**आदेशावरुन,**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड.**



## जाहीर प्रगटन

**मा. श्री.ए.एम.पाटील ५ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १६७२ / २०२४ ॲड. ए. एस. कुलकर्णी यांच्या मार्फत**
**हृदयकुमार बालकृष्णा जोतकर वि. निरंक**

ज्यापेक्षा बालकृष्ण केशवराव जोतकर हे दिनांक है दिनांक ०४.०७.२०१६ रोजी अहमदाबाद (गुजरात) येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार

१. हृदयकुमार बालकृष्ण जोतकर, वय-३९ वर्षे, रा. कलसंबर, ता. जि. बीड ह.मु. इ-११९, हरीधाम सोसायटी, पार्श्वनाथ टाउनशिप, नवा नरोडा, अहमदाबाद सिटी, गुजरात अर्जदार हा मयत नामे बालकृष्ण केशवराव जोतकर, यांचा मुलगा आहे. मयताची पत्नी जागृती बालकृष्ण जोतकर या दिनांक ०४.०५.२०२० रोजी मयत झालेल्या आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत बालकृष्ण केशवराव जोतकर व जागृती बालकृष्ण जोतकर यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २३/१२/२०२४ आहे.

आज दिनांक २५ नोव्हेबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**क. लिपीक**

**आदेशावरुन,**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड.**



हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# सुरेश धस यांच्या भाषणाचा विपर्यास करून वातावरण खराब करणार्यांची कीव येते - रेवण खाडे

आष्टी (प्रतिनिधी) आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात सुरेश धस यांचा प्रचंड मताने विजय झाला.विजय झाल्यानंतर सुरेश धस यांनी विजयी सभेत केलेल्या भाषणाचा काही संधीसाधू लोकांनी विपर्यास करून त्यांची राजकीय पोळी भाजण्याचा केविलवाणा प्रयत्न असून त्यातून आ.पंकजाताई मुंडे आणि आ.सुरेश धस यांच्यातील दरी आणखी कशी वाढेल यासाठी काही विघ्नसंतोषी लोक जे नेहमी समाजासमाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत.अशा लोकांनी विधानसभा निवडणुकीत झालेल्या काही अप्रिय घटना बाबत सत्य परिस्थिती समजून घेतली पाहिजे असे मत सामाजिक कार्यकर्ते रेवणनाथ खाडे यांनी व्यक्त केले भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ नेतृत्व असलेल्या आमदार पंकजाताई मुंडे यांच्या समर्थकांनी विधानसभा निवडणुकीतील प्रचारांमध्ये अपक्ष उमेदवाराचे प्रचार करण्यास सांगितले आहे असा व्हिडिओ झाल्याने पाच टर्म आमदार राहिलेले नवनिर्वाचित आमदार सुरेश धस यांनी हा प्रकार धक्कादायक असल्याचे वक्तव्य केले होते याबाबत त्यांनी मनातील खंत व्यक्त केली याचा विपर्यास अपक्ष उमेदवाराचा प्रचार केलेल्या काही व्यक्तींनी गैरफायदा घेत या दोन मोठ्या नेतृत्वामध्ये भांडणे लावण्याचा उद्योग केला आहे असे सांगून



रेवणनाथ खाडे पूढे म्हणाले की,

विजयी सभेत आ.सुरेश धस यांनी जे सांगितलं ते म्हणजे पंकजाताई मुंडे यांनी मला मदत केली नाही,मला पाडण्यासाठी प्रयत्न केले हे माझ्या मनाला लागलं असे ते म्हणाले.म्हणजे ताई तुमच्या कट्टर म्हणवणाऱ्या आणि तुम्ही मतदार संघात आल्या की तुमच्या आजूबाजूला मोहोळा सारखे चिकटणाऱ्या लोकांनी मी अडचणीत असताना मला मदत तर केली नाहीच शिवाय माझ्या विरोधात अपक्ष उमेदवाराचा जाहीर प्रचार केला.अशावेळी तुम्ही त्यांना सुनावलं पाहिजे होत मात्र तुम्ही देखील काही बोलला नाहीत.म्हणजे याला तुमचा दुजोरा असल्याचे दिसून आले असे ते म्हणाले.मात्र त्यांच्या भाषणातील मतितार्थ कोणीही लक्षात घेतला नाही.शिवाय याची शहानिशा करण्याचा प्रयत्न देखील कुणी केला नाही.उलट ही संधी साधत आ.पंकजाताई मुंडे आणि आ.सुरेश अण्णा धस यांच्यातील दरी कशी वाढेल याचा जे लोक प्रयत्न करत आहेत त्या लोकांनी सुरेश अण्णांना मदत तर केली नाहीच उलटपक्षी अपक्ष उमेदवार यांच्या शिट्टीचा प्रचार करण्यासाठी गावोगाव बैठका घेऊन पंकजा ताईंचा निरोप आहे असे उघडपणे सांगत विरोध केला.अशावेळी भाजपचे उमेदवार असलेले सुरेश धस यांनी लोकसभेला पंकजाताईंना निवडून आणण्यासाठी दिवसरात्र एक केले.मराठा समाजाचा रोष पत्करत दारोदार फिरले.मराठा बहुल गावातून पंकजाताईंना मताधिक्य दिले.३२ हजाराची लीड देण्याचे काम केले.अशावेळी सुरेश धस यांची प्रामाणिक इच्छा होती की मी अडचणीत असल्यावर मला प्रामाणिक मदत झाली पाहिजे.कारण भाजपचे ते उमेदवार होते,अशावेळी त्यांना अडचणीत आणण्यासाठी जर प्रयत्न झाला असेल तर त्यांनी त्यांच्या मनातील खंत बोलून दाखविने स्वाभाविक होते.मात्र याचा विपर्यास करून मतदार संघातील वातावरण खराब करण्यासाठी निवडून न आलेले विरोधक जर याचे भांडवल करत असतील तर त्याच्या बुद्धीची कीव करावीशी वाटते असे मत रेवणनाथ खाडे यांनी व्यक्त केले.

# मनं जोडण्याची परंपरा वाचनातून जोपासली जाते - मोहिब कादरी

लातूर /प्रतिनिधी

माणसानं आपलं जगणं सुंदर करायचे असेल तर आहे त्याचा उत्सव करावा,जगणं सुकर करायचे तर चांगलं वाचन महत्वाचे आहे असे सांगून,माणसांची मनं जोडण्याची परंपरा वाचनातून जोपासली जाते,असे मत प्रसिध्द साहित्यिक मोहिब कादरी यांनी व्यक्त केले.

माळकोंडजी ता.औसा येथील गोपाळबुवा सार्वजनिक ग्रंथालयात रविवार,दि.२४ नोव्हेंबर रोजी आयोजित दिवाळी अंकाच्या प्रदर्शनाचे उद्घाटन करताना ते बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी वाचनालयाचे अध्यक्ष प्रकाश विभूते हे होते.प्रमुख पाहुणे म्हणून माजी




शिक्षणाधिकारी राम गारकर हे होते.मंचावर सत्कारमूर्ती जिल्हा सार्वजनिक ग्रंथालयाचे कार्याध्यक्ष डॉ.ब्रिजमोहन झंवर,जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका रचना पूरी,आलमलाच्या विश्वेश्वर फार्मसीचे प्राचार्य डॉ.विश्वेश्वर धाराशिवे, साहित्यिक द.मा.माने यांची उपस्थिती होती.

# महायुतीच्या विजयाचा अनिल जगताप यांच्याकडून जल्लोष साजरा !

## एकनाथ शिंदे यांची महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदावर वर्णी लागावी यासाठी शिवसैनिकांकडून साकडे

बीड (प्रतिनिधी)

नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीत मा.ना.एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीला मिळालेल्या अभूतपूर्व विजयी यशाबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिल जगताप यांच्या मार्गर्शनाखाली बीडमध्ये शिवसैनिकांनी महायुतीचे अभिनंदन करत मोठ्या हर्षल्हासात आनंद सोहळा साजरा केला तसेच हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर मा. आनंद दिघे यांच्या विचारांचा वारसा घेऊन महाराष्ट्रभरात सर्व सामन्यांसाठी कल्याणकारी योजना राबवत यशाची पताका फडकावणारे शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांची महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदावर वर्णी लागावी यासाठी बीड शहरातील सोमेश्वर महादेव मंदिरात भावीक भक्तांच्या उपस्थितीत सामूहिक आरती करून जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांच्या समर्थकांनी साकडे देखील घातले.

काल सोमवारी दि. २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिल जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी शिवसैनिकांनी एकत्रित येऊन महापुरुषांना अभिवादन केले. त्यानंतर हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या




प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून फाटक्यांची आतषबाजी करत शिवसेनेचा जयघोष केला तसेच सर्वांनी मिठाई वाटून आनंदत्सव साजरा केला. मा.मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणी, लाडके भाऊ, लाडके शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, कार्यकर्ते व लाडके शिवसैनिक यांच्या कष्टातून विधानसभा निवडणुकीत आपणांस भरघोस यश मिळाले असल्याच्या भावना याप्रसंगी व्यक्त करण्यात आल्या.या निमित्ताने सायंकाळच्या दरम्यान शिवसैनिक तथा महिला भगिनींनी पणती व दिवे प्रज्वलीत केले तसेच विविध मंदिरात देखील शिवसैनिकांनी देवी देवतांच्या चरणी नतमस्तक होऊन आरत्या केल्या व शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांची महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदावर वर्णी लागावी यासाठी प्रार्थना केली. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती शाम पडूळे, शिवसेना जेष्ठ नेते सुरेश शेटे, महिला आघाडी जिल्हा सहसंपर्कप्रमुख डावकर ताई, शिवसेना जिल्हा संघटक सुनील सुरवसे, शिवसेना जिल्हा संघटक योगेश नवले, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अजय जाधव, शिवसेना विधानसभा प्रमुख सुनील अनभुले, शिवसेना तालुका संघटक गणेश मस्के, सुदर्शन धांडे, सुनील गवते, गजानन कदम, शिवसेना शहर संघटक नवनाथ शिंदे, शिवसेना शहर सह संघटक ऋषिकेश जोगदंड, शिवसेना उप शहर प्रमुख हनुमानप्रसाद पांडे, शिवसेना उपशहर प्रमुख अक्षय काशीद, माजी सरपंच संदीपान बडगे, शिवसेना विभाग प्रमुख सदाशिव सुर्वे , शिवसेना विभाग प्रमुख शहर रणजीत बुंदिले, सरपंच अंकुश गायकवाड,अमोल मामा जाधव, उत्कर्ष धपाटे, गणेश काळे, अनिल खांडे, अविनाश पाटोळे,तुकाराम गोरे, गणेश डांगे, राहुल कोकाटे, अजय सुरवसे, प्रताप जगताप, गणेश काळे व आदी उपस्थित होते.

# राघवेंद्र देबडवार यांना मराठवाडा गौरव पुरस्कार - २०२४ जाहीर

मुंबई /राजयोग प्रतिनिधी

लातूर येथील देबडवार मल्टीसर्व्हिसेसचे संचालक राघवेंद्र बालाजी देबडवार यांना मराठवाडा गौरव पुरस्कार - २०२४ जाहीर झाला आहे. त्यांना हा पुरस्कार लघुउद्योग आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीत कार्य केले त्यासाठी प्रदान करण्यात येणार आहे.सदरील पुरस्कार भारतीय सिनेयुग प्रोडक्शन अकॅडमी, मुंबई. या संस्थेकडून मिळणार आहे. हा पुरस्कार वितरण दादर, मुंबई येथील सुप्रसिद्ध शिवाजी मंदिर नाट्यगृह येथे २९ नोव्हेंबर रोजी प्रदान होणार आहे, अशी माहिती संस्थेचे संचालक अनिलकुमार शिंपी यांनी दिली आहे.हा पुरस्कार देबडवार यांना जाहीर झाला म्हणून त्यांचा संपूर्ण जिल्हयातुन मित्र परिवार आणि कुटुंबियांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# लातूर येथील माजी सैनिक मुलांचे वसतिगृहात निवासी अशासकीय वसतिगृह अधीक्षक पदभरती

लातूर /प्रतिनिधी

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांच्या आस्थापनेवरील माजी सैनिक मुलांचे वसतिगृह, लातूर येथे निवासी अशासकीय वसतिगृह अधिक्षक पद तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधन प्रतिमहा रक्कम रुपये ३१ हजार ८७५ प्रमाणे भरण्यात येणार आहे.

या पदासाठी इच्छूक माजी सैनिक (फक्त जेसीओ) उमेदवारांनी आपल्या अर्ज व सर्व मूळ कागदपत्रासह मुलाखतीसाठी ३ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे स्वत: उपस्थित रहावे. निवड करण्यात आलेल्या उमेदवारास तात्काळ कामावर घेण्यात येणार आहे, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्तीचे अर्ज सादर करण्याचे आवाहन

लातूर/प्रतिनिधी

महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क (फ्रीशिप), राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यावसायिक पाठयक्रमांशी संलग्न असलेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता योजनेचा लाभ दिला जातो. या योजनांसाठी सन २०२४-२५ या वर्षासाठी नवीन अर्ज भरण्यासाठी २५ जुलै २०२४ पासून महाडीबीटी पोर्टल सुरु करण्यात आले आहे.

८ जानेवारी २०१९ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार संबंधित महाविद्यालयांत राबविण्यात येणारे अभ्यासक्रमाची शिक्षण शुल्कांची मंजूरी, विद्यापिठांमार्फत दिली जाणारी इतर शुल्काची मंजूरी व शैक्षणिक विभाग, शासकीय यंत्रणा यांचेकडून घेण्यात येणारी मंजूरी या सर्व बाबींची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य व संबंधित लिपीक कर्मचारी यांची असल्याने या कामकाजास प्राधान्य देण्यात यावे.

महाविद्यालयामध्ये स्थापन करण्यात आलेल्या समान संधी केंद्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जाबाबतच्या अडचणी सोडवाव्यात. विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती मार्गदर्शन शिबिरे

# महाराष्ट्रात महायुतीची सत्ता पण मुख्यमंत्री कोणाचा ?

अमित जाधव ।प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीचा सामना महायुतीने एकहाती जिंकला. महाविकास आघाडीला चारीमुंड्या चीत करत महायुतीने पुन्हा सत्ता तर काबिज केली आहे, पण मुख्यमंत्रिपदी कोण ? विराजमान होणार याची चर्चा आता रंगली आहे. अर्थातच, भाजपाने राज्यात न भूतो न भविष्यती असा विजय मिळवला असल्याने या पदावर त्यांचाच दावा असू शकतो. त्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव चर्चेत असले, तरीही त्यासाठी वेगळा प्रयोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रामध्ये महायुतीचा दारुण पराभव झाला. त्यावेळी निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, भाजपाच्या नेतृत्वाखालील शिवसेना शिंदे गट आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या महायुतीने तब्बल २३० जागा जिंकत नवा राजकीय इतिहास रचला. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुतीने राबविलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कमालीची गेमचेंजर ठरली. महाविकास आघाडीला केवळ ४६ जागा मिळाल्या. तर, महायुतीत एकट्या भाजपाने १३२ जागा जिंकल्या.



१९९० नंतर विधानसभा निवडणुकीत सार्वधिक जागा जिंकणारा भाजपा हा पहिला पक्ष ठरला आहे. भाजपाने २०१४ पासून सलग तिसऱ्यांदा शतकी मजल मारली आहे. आता ऐतिहासिक कामगिरी करणाऱ्या भाजपाकडून मुख्यमंत्रिपदावर दावा केला जाण्याची शक्यता आहे. त्यासाठी भाजपाचे ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांचे नाव सर्वात आघाडीवर आहे.



केजच्या आमदारपदी नमितातार्ई अक्षय मुंदडा यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना नेकनूर येथील माजी ग्रां . प . सदस्य सतीश मुळे , दादाराव जाधव सोबत बिभीषण नन्नवरे , मतीन खतीब व आमेर जहागरिदार



देवणी ।प्रतिनिधी

निलंगा विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार तथा भावी जिल्हा पालकमंत्री संभाजी पाटील निलंगेकर यांची आमदार पदी निवड झाल्याबद्दल सावरगांव वासियांच्यावतीने साहेबांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या या वेळी काशिनाथ मुंगे सरपंच सावरगांव, सुग्रीव बोरुळे भाजपा बुथ प्रमुख ,संगमेश्वर पाटील, अर्जुन बिरादार, ज्ञानेश्वर सावळे ,गोकुळ कापडे, नामदेव भिंगे,

# यशवंतरावांच्या ध्येयवादी क्षितिजातूनच नवा महाराष्ट्रउगवला ! - दिलीप पनकुले

यशवंतराव चव्हाण साहेबांनी महाराष्ट्राच्या आधुनिकीकरणाचा ध्यास घेतला होता. त्यासाठी महाराष्ट्रीयच नव्हे तर एकूणच भारतीय मनाला वैज्ञानिक दृष्टी आणि दृष्टिकोन प्राप्त व्हावा यासाठी ते अथक धडपड करीत होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या या जिद्दी ध्येयवादी ध्येयवादी क्षितिजातूनच नवा महाराष्ट्र उदयास आला आहे असे मत प्रदेश सरचिटणीस तथा संस्थाध्यक्ष दिलीप पनकुले यांनी व्यक्त केले.

ते माँ वैष्णवी शिक्षण संस्था द्वारा संचालित शांती विद्या भवन शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, डिगडोह येथे यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने आयोजिलेल्या कार्यक्रमात बोलत होते. माँ वैष्णवी शिक्षण संस्थेच्या कोषाध्यक्षा डॉ. सुषमा पनकुले आणि संस्थेचे सचिव श्री. संग्राम पनकुले हे या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी होते. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. प्रकाश राठोड, मुख्याध्यापिका सौ. ममता ढोरे, प्राथमिक



विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. छाया चौहान प्रामुख्याने उपस्थित होत्या. तसेच प्रा. बबलू चव्हाण, प्रा. विनोद इंगळे, सौ. रीता महाजन, श्री. निलिंद जगताप, सुनील शंभरकर, चैताली खेडकर, सौ. घागरे, सौ. चोखांद्रे मॅडम, सौ. आरती देशमुख, श्री. सुधाकर शिंगणे, श्री. घोडे, श्री. मोहन जाधव, सौ. आरती देशमुख, श्री. श्रीनिवास दुबे आदी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# आमदार नारायण कुचे यांना मंत्री मंडळात समावेश करा - सरपंच विनोद मगरे

जालना प्रतिनिधी :- बदनापूर विधानसभा मतदारसंघातून सलग तीन वेळा निवडून येणारे विद्यमान विकासप्रिय, विकासाची गंगा आणणारे लोकप्रिय आमदार मा. श्री. नारायण कुचे यांचा मंत्री मंडळात समावेश करण्याची मागणी बदनापूर मतदार संघातील देवगावचे सरपंच विनोद मगरे यांनी पक्ष प्रमुखाकडे केली असून आमदार नारायण कुचे यांनी मतदार संघात विविध विकास कामे केली आहे. रस्ता, पाणी, पाणंद रस्ते, नाल्या, शासकीय कार्यालये, सिमेंट कॉँक्रीटचे रस्ते, गावोगावी सभामंडपे, पाणीपुरवठा, नळयोजना, निराधार महिलांना पगारी, जलसिंचन असे अनेक प्रकारचे कामे आपल्या मतदार संघात साहेबांनी केले असून गोरगरिबांचे ते कैवारी असून लोकांच्या सुख दुःखात सहभागी होणारे व्यक्तिमत्व म्हणुन त्यांची ओळख आहे. मतदार संघात जास्त निधी आणणारे एकमेव आमदार म्हणुन त्यांचा परिचय असून त्याचा मंत्रिमंडळात समावेश करावाअशी मागणी देवगाव चे सरपंच विनोद मगरे



यांनी पक्षप्रमुखा कडे केली आहे.



उमरगा - उमरगा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार प्रवीण स्वामी यांचा सन्मान राष्ट्रीय जंगम संघटना, वीरशैव माहेश्वर मंडळ, पुणे जिल्ह्याच्या वतीने करण्यात आला.

# वाचाळ वीरांवर गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी आ.सुरेश धस समर्थक आक्रमक

## आष्टीसह मतदारसंघ बंद करण्याचा इशारा

आष्टी (प्रतिनिधी)आष्टी विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांच्या समर्थकांनी अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांचा प्रचार केल्यामुळे दुखावलेल्या आमदार सुरेश धस यांनी आमदार पंकजा मुंडे यांनी असे करावयास नको होते असे वक्तव्य विजयी सभेमध्ये केल्यानंतर आमदार पंकजा मुंडे समर्थकांनी आमदार सुरेश धस यांचे कुटुंबीयांवर अत्यंत खालच्या पातळीमध्ये टीका टिपणी केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यामुळे आमदार सुरेश धस यांचे समर्थक आक्रमक झाले आणि त्यांनी या वाचाळवीरांवर कायदेशीर कारवाई करून त्यांना अटक करावी अन्यथा संपूर्ण मतदारसंघातील गावांमध्ये बंद करून निषेध व्यक्त करण्यात येईल असा इशारा आमदार सुरेश धस यांचे समर्थकांनी दिला आहे. आष्टी पोलीस स्टेशन मध्ये दिलेल्या निवेदनामध्ये म्हटले आहे की,आ.सुरेश धस यांचा विक्रमी मताने विजय झाल्यानंतर भा.ज.पा.च्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी विरोधी उमेदवाराला मदत करून पराभव करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप सुरेश धस यांनी केला सोशल मीडियावर पंकजा मुंडे यांच्या समर्थकांनी आमदार सुरेश धस यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबीयांवर खालच्या पातळीवर जाऊन टीका टिपणी करत असल्याचे व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर आष्टी पोलीस स्टेशन येथे समर्थकांनी घोषणाबाजी करत जाहीर निषेध व्यक्त करत आमच्या दैवताबाबत वक्तव्य करणाऱ्या व्यक्तींवर गुन्हे दाखल करून २४ तासाच्या




आत अटक करावे अन्यथा तीव्र आंदोलन करत आष्टी शहरासह मतदार संघातील गावागावात बंद पाळण्याचा इशारा समर्थकांनी दिला असून आष्टी पोलीस स्टेशनचे निरीक्षक शरद भुतेकर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे. दलित,आदीवासी,भटके विमुक्त,वंचीत,बहुजन समाजाचे नेते आ.सुरेश धस यांच्या कुटुंबीयावर राजकीय द्वेषापोटी अश्लिल भाषेत बोलुन तो व्हीडीओ व्हायरल करून आ.सुरेश धस यांची बदनामी केलेली आहे.भावना दुखवल्या आहेत. त्यामुळे अशा वक्तव्य करणाऱ्या सर्व संबंधीतांवर सायबर अॅक्टनुसार गुन्हे दाखल करून अटक करावी.भारतीय संविधानाने कलम १९ नुसार अभिव्यक्ती स्वतंत्र दिले आहे. त्यानुसार आमदार सुरेश धस यांनी विजयी सभेत संवैधानिक भाषेत आपले मत व्यक्त केलेले आहे. परंतु पंकजा मुंडे यांचे कार्यकर्ते समर्थक समाजा-समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे कृत्य करत आहेत.महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांनी महिलांबद्दल बोलताना जी संस्कृती व परंपरा घालून दिलेली आहे त्याच महाराष्ट्रात महिलेबद्दल असे अश्लील भाषेत बोलणाऱ्या गावगुंडावर तात्काळ गुन्हे दाखल करन अटक करावी अन्यथा आष्टी तालुका बंदची हाक देत आहोत.तात्काळ कारवाई न झाल्यास होणाऱ्या परिणामाची जबाबदारी प्रशासनावर राहील याची नोंद घ्यावी असे निवेदनात नमूद केले आहे यावेळी पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




- मुंबई- येवला विधानसभा मतदारसंघातून सलग पाचव्यांदा प्रचंड बहुमताने विजयी झाल्याबद्दल ना. छगनराव भुजबळ साहेब यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना राज्य अन्न आयोग महाराष्ट्राचे अध्यक्ष अॅड. सुभाष राऊत दिसत आहेत.

# मी जरी विजयी झालो नसलो तरी जनतेच्या कामासाठी सदैव तत्पर राहणार

## जायकवाडी धरणातून डाव्या कालव्याद्वारे शेतीसाठी पाणी सोडा : माजी मंत्री राजेश टोपे

मी जरी विजय झालो नसलो तरी जनतेच्या कामासाठी सदैव तत्पर राहणार असल्याने शेतकऱ्यांनी केलेल्या मागणीनुसार माजी मंत्री राजेशभैय्या टोपे साहेब यांनी जायकवाडी धरणातून डाव्या कालव्याद्वारे शेतकरी बांधवांची गरज लक्षात घेता शेतीसाठी पाणी सोडणे बाबत कडाचे कडाचे अधीक्षक अभियंता एस.के.सब्बीनवार यांच्याशी दूरध्वनीद्वारे विनंती केली.जायकवाडी धरणातून आज दिनांक 25 नोव्हेंबर वार सोमवार रोजी संध्याकाळी पाणी



सोडण्यात येणार असल्याचे कडाचे अधीक्षक अभियंता एस.के.सब्बीनवार यांनी सांगितले.शेतकरी बांधवांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा असे आवाहन माजी मंत्री राजेश टोपे यांनी केले आहे.

# जातीय समीकरणाची सांगड मिळालेल्या मताधिक्यामुळे आ. अंतापूरकर मंत्रिपदाच्या रेसमध्ये !

देगलूर प्रतिनिधी शिवकुमार बिरादार देगलूर, महायुतीने सरकार बनवण्याच्या दृष्टीने पावले उचलली आहेत. लवकर महायुतीचा महायुतीचा शपथविधी होणार असून, या सरकारच्या मंत्रिमंडळात जातीय समीकरणाची सांगड घालावी लागणार आहे. वर्षानुवर्ष मंत्रिपदापासून दुर्लक्षित राहिलेल्या मातंग समाजाला यंदा न्याय मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या निवडणुकीत मतदारांनी महाविकास आघाडीला मोठमोठे धक्के देत महायुतीच्या पारड्यात मतांचे भरभरून दान टाकले आहे. भाजपला आतापर्यंतच्या इतिहासात सर्वाधिक जागा देताना शिंदे आणि अजित पवार गटालाही जनतेने हे राज्य सरकार पुन्हा हाकण्यासाठी संधी उपलब्ध केली आहे. जितेश अंतापूरकर यांनी विधान सभेच्या निवडणुकीत 1,07841 इतके मते घेऊन विजय मिळवला असून माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचे अत्यंत विश्वासू, व शांत संयमी वृत्तीचे सर्वांच्या मर्जीतले अशी त्यांची ओळख आहे. दिगवंत आमदार रावसाहेब अंतापुरकर यांचे सर्व आमदाराबरोबर असलेले चांगले संबंध सर्व गोष्टीचा जितेश अंतापुरकरांना यांना फायदा होईल व नवयुवक मंत्री पद मिळेल अशी चर्चा सध्या जोरदार चालू आहे. आणि देगलूर विधानसभेमध्ये प्रथमच भाजपाचा उमेदवार विजय झाल्यामुळे शक्यता जास्त आहे जितेश हे मातंग समाजाचे आमदार मंत्रिपदाच्या रेसमध्ये आहेत. या निवडणुकीत मातंग समाजाचे एकूण सहा उमेदवार उभे होते, त्यापैकी भाजपकडून दोघे निवडून आले. राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून उभे असलेले पृथ्वीराज साठे (केज) व सुधाकर भालेराव (उदगीर) तसेच



काँग्रेसकडून उभे असलेले रमेश बागवे (पुणे) व राजू आवळे (इचलकरंजी) यांचा पराभव झाला.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मागील वेळेस मातंग समाजाला घसघशीत योजना दिल्या. अण्णा भाऊ साठे प्रशिक्षण व संशोधन संस्था अर्थात आर्टी, अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाला भरभरून निधी, घाटकोपर येथे होऊ घातलेल्या अण्णा भाऊ साठे यांच्या स्मारकास तसेच पुणे येथील संगमवाडीत उभारल्या जात असलेल्या लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मारकासाठी निधीची घोषणा केली. ऐतिहासिक अशा आरक्षण वर्गीकरणालाही मंजुरी दिल्याने मातंग समाजाचा सर्व घटकातील टक्का विकासाच्या दृष्टीने पुढे जाईल यात वाद नाही.नांदेड जिल्ह्यातील देगलूर बिलोली मतदारसंघातून आ. जितेश अंतापूरकर यांनी विजयश्री खेचून आणला आहे. हे भाजपाकडून आता मातंग समाजाचे प्रतिनिधीत्व करतात. मातंग समाजाला न्याय द्यायच्या भूमिकेतून जितेश अंतापुरकरांचा मंत्रिपदासाठी विचार करावा, अशी मागणी संपूर्ण महाराष्ट्रतून जोर धरत आहे. शिवसेना एकनाथ शिंदे गट अथवा राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून मातंग समाजातील एकही आमदार निवडून आलेला नाही. या नवख्या आमदारांचा विचार करावासा झाल्यास आ. जितेश अंतापुरकर हे मंत्रिपदाला न्याय देऊ शकतील अशी ही आता नांदेड जिल्ह्यात चर्चेला उधान आले आहे.

# वाटुर लावणी तांडा जयपुर वझर सरकटे रस्त्याच्या मजबुतीकरण कामास आमदार लोणीकरांच्या विशेष प्रयत्नातून 32 कोटी रुपये निधी



जालना | प्रतिनिधी :
वाटुर लावणी तांडा जयपुर वझर सरकटे या अतिशय वर्दळ असलेला हा रस्ता खड्डे पडल्याने फुटून खराब झाला होता. या रस्त्याची खडीकरण मजबुतीकरण व डांबरीकरण व्हावे याकरिता निधी मिळावा यासाठी महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी विधानसभेच्या सभागृहात तारांकित प्रश्न उपस्थित करून या रस्त्याच्या कामाकडे सरकारचे लक्ष वेधले होते. त्यामुळे सुमारे ३२ कोटी रुपये निधी या रस्त्या करिता राज्य शासनाच्या वतीने आमदार लोणीकरांच्या विशेष पर्यत्नातून मंजूर झाला होता. काही दिवसापूर्वी आमदार लोणीकरांच्या शुभहस्ते या रस्त्याचे भव्य उद्घाटन संपन्न झाले होते. पावसाळी दिवसात डांबरीकरणाचे काम पूर्ण केल्यास लवकर रस्ता खराब होतो व डांबर निघून जाऊन पुन्हा खड्डे पडतात म्हणून व तसेच ज्या खदानीतून या रस्त्याच्या कामाकरिता दगड वापरला जात होता त्या खदानीत पाणी भरले होते. म्हणून काही दिवस या रस्त्याचे काम रखडले होते. परंतु आता पुन्हा माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांचा परतुर विधानसभा मतदारसंघात दणदणीत पणे प्रचंड मतांनी विजयी होताच. परतूर विधानसभा मतदारसंघाचे नवनियुक्त आमदार बबनराव लोणीकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागासह संबंधित गुत्तेदाराला सूचना दिल्याने तात्काळ या रस्त्याची काम सुरू झाले आहे. यामुळे लोकप्रतिनिधी असावा तर असा. विकास प्रिय विकासाची जाण असलेला लोकप्रतिनिधी निवडल्याची भावना या रस्त्यावरील गावागावातील मतदार नागरिक करत आहेत.

## विधानसभा निवडणुकीचा निकाल लागताच आमदार लोणकर यांच्या सूचनेवरुन बीबीएम डांबरीकरण खडीकरणाच्या कामाला सुरुवात

# भावसार समाजाच्या जिल्हाध्यक्षपदी प्रकाश कानगांवकर यांची निवड

## कार्याध्यक्ष गोपाळ कंकाळ तर सचिवपदी अनिल सुत्रे, कोषाध्यक्षपदी कल्याण पतंगे

बीड (प्रतिनिधी):

बीड जिल्हा भावसार समाजाची महत्त्व पुर्ण बैठक नुकतीच श्री क्षेत्र परळी वैजनाथ येथे बीड जिल्हा भावसार समाजाच्या कार्यकारिणी संदर्भात आयोजित करण्यात आली होती. यामध्ये बीड येथील सामाजिक कार्यकर्ते सर्व सामान्य माणसाच्या सुखदुःखात सहभागी होणारे खर्या अर्थाने या पदाला न्याय देणारे प्रकाशराव कानगावकर यांची एकमताने बीड जिल्हा भावसार समाजाच्या जिल्हाध्यक्षपदी पुन्हा एकदा एकमताने निवड करण्यात आली आहे. तसेच परळी येथील गोपाळ कंकाळ यांची कार्याध्यक्ष पदी तर सचिवपदी अनिल सुत्रे, कोषाध्यक्षपदी कल्याण पतंगे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीनंतर जिल्हाभरा सह राज्य भरातुन समाज बांधवांनी अभिनंदन करत पुढिल कार्यास शुभेच्छा दिल्या.

कार्यकारिणी निवडी नंतर झालेल्या सत्कार समारंभारत उत्तर देताना नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष प्रकाश कानगावकर यांनी सांगितले की, या पुढे समाजातील सर्व सामान्य माणसाला सोबत घेऊन समाजा समोरील असेलेल्या अडचणी या मध्ये प्रामुख्याने समाजातील मुला, मुलीचे विवाह, संबधित अडचणी या साठी जिल्हास्तरीय वधू वर परिचय मेळावा आयोजित करणे, समाजातील प्रत्येक घटकाचे आर्थिक स्तर उंचविण्यासाठी शासान स्तरावर संत जनाबाई भावसार समाज आर्थिक विकास महामंडळ स्थापना संदर्भात पाठपुरावा करणे, विद्यार्थ्यांना वस्तीगृह तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावे, युवकांना उद्योग-व्यवसायासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील रहाणार आहे, महिला-भगिनींसाठी देखील शासनाच्या विविध योजना व बचत गटाच्या माध्यमातून त्यांचा आर्थिक स्तर उंचाविण्यासाठी प्रयत्न करणार आहे. तसेच जिल्ह्यातील भावसार



समाजाची जनगणना करणार असल्याचेही नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांनी सांगितले. तर नवनिर्वाचित कार्याध्यक्ष गोपाळ कंकाळ, सचिव अनिल सुत्रे, कोषाध्यक्ष कल्याण पतंगे, यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की समाजातील बेरोजगार युवकांना मुख्य प्रवाहात सहभागी करून त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न करुन समाजातील युवक कसा उभा राहिल यासाठी नक्कीच प्रयत्न करु. दरम्यान उर्वरित कार्यकारिणी लवकरच जाहीर करु असे नवनिर्वाचित अध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांनी सांगितले. यावेळी झालेल्या बैठकीस ज्येष्ठ मार्गदर्शक भालचंद्र तांदळे, गोपाळराव तांदळे, बंडु गरुड, सुधर्मा सदरे, श्रीराम गुंडाळे, भाकरे, सदरे, बीड भावसार समाजाचे अध्यक्ष कैलास रंगदळ, वडवणी भावसार समाजाचे महेश सदरे, विक्रम गार्डी, मंगेश गार्डी, गोविंद सुत्रावे, भगवान पतंगे, विनोद बारटक्के, माजलगाव भावसार समाजाचे अध्यक्ष प्रदीप भावसार, सतीष गरुड, श्रीराम कळसकर, परळी भावसार समाजाचे अध्यक्ष प्रभाकरराव हजारे, उपाध्यक्ष विष्णु क्षीरसागर, युवा अध्यक्ष विलास सुत्रावे, अंबाजोगाई भावसार समाजाचे अध्यक्ष मणिष सुत्रावे, विनोद घाटे, किशोर काकडे, संतोष खेडकर, बुलबुले, बोंडगे, लखन फटाले यांच्यासह भावसार समाजाचे बीड, वडवणी, माजलगाव, परळी, अंबाजोगाई येथील अध्यक्ष, उप अध्यक्ष, सचिव सह सर्व युवक कार्यकारिणी, समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयामध्ये 'कॅम्पस इंटरव्यू ' संपन्न

## रिलायन्स निपॉन कंपनीतर्फे ८२ विद्यार्थिनींच्या मुलाखती

परळी (प्रतिनिधी)

येथील कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात ' प्लेसमेंट सेल 'च्या वतीने रिलायन्स निपॉन कंपनीतील नोकरीकरिता 'कॅम्पस इंटरव्यू 'चे आयोजन करण्यात आले होते दि २५ /११ /२०२४ रोजी ११:०० वाजता या मुलाखती घेण्यात आल्या. त्यात महाविद्यालयातील ८२ विद्यार्थिनींनी मुलाखतीमध्ये सहभाग नोंदविला. रिलायन्स निपॉनचे अधिकारी अमित भावसार यांनी या मुलाखती घेण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडली.

मुलाखतीच्या अगोदर झालेल्या छोटेखाणी उद्घाटन समारंभामध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्या तथा संचालिका डॉ. विद्या देशपांडे यांनी विद्यार्थिनींच्या हितासाठी महाविद्यालयातर्फे दरवर्षी अशा कॅम्पस इंटरव्यूचे आयोजन करण्यात येते आणि त्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यामध्ये महाविद्यालय महत्त्वाची



भूमिका पार पाडत असते अशी आपली आणि महाविद्यालयाची भूमिका अभिव्यक्त केली.यापूर्वी परमस्कील,जिओ या कंपनीतही आम्ही नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिलेल्या आहेत असे त्यांनी यावेळी सांगितले.मुलाखतीचे आयोजन व ही प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी प्लेसमेंट सेलच्या प्रमुख प्रा.डॉ .राजश्री कल्याणकर ,प्रा. डॉ. वर्षा मुंडे,प्रा.डॉ. राजकुमार यल्लावाड यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सांगवी पाटण येथे भैरवनाथ जन्माष्टमी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

आष्टी (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे सालाबाद प्रमाणे २३ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर या कालावधी मध्ये भव्य भैरवनाथ जन्माष्टमी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.सालाबाद प्रमाणे या सोहळ्यासाठी गावातील भावीक भक्त वेगवेगळ्या माध्यमातुन काशी, पैठण, नागतळा येथून कावडीचे जल आणत, मोठ्या श्रद्धेने पवित्र जलाने रात्री बाराला अभिषेक घालतात. मुख्य आकर्षक भैरवनाथ मंदिराला भव्य दिव्य, रोषनाई तसेच मंदिरात फुलांची सजावट, आकाशात फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली.

या सोहळ्याच्या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शनिवार दि. २३/११/२०२४ रोजी संध्याकाळी ९ ते ११ यावेळेस ह. भ. प. किर्तन केसरी राजेंद्र महाराज वाघमारे (गोंदीकर) जालना यांचे जाहिर हरिकिर्तन झाले तसेच २४/११/२०२४ सकाळी ९ ते ११ यावेळेस ह. भ. प. भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री संस्थान सांगवी पाटण यांचे हरीकिर्तन झाले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने विविध क्षेत्रात काम करणाऱ्या भाविक भक्तांकडून व ग्रामस्थांकडून



कार्यक्रमासाठी विविध सेवा, देणगी देण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाने सोहळ्याची सांगता झाली. या सोहळ्याप्रसंगी राजकीय, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रातील मान्यवर तसेच पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आज मुंबई येथे भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा.ना.श्री.चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांची आ.सुरेश अण्णा धस यांनी सदिच्छा भेट घेतली. बावनकुळे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या अभूतपूर्व यशाबद्दल त्यांचे अण्णांनी अभिनंदन केले.बावनकुळे साहेब यांनी पाचव्यांदा आष्टी विधानसभा आमदारपदी सुरेश आण्णा धस यांची निवड झाल्याबद्दल अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी समवेत चिंचवड विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार श्री शंकरशेठ जगताप उपस्थित होते.



भारतीय जनता पार्टीचे नेते,महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने अभूतपूर्व असे यश संपादन केल्याबद्दल आज मुंबई सागर बंगला येथे फडणवीस साहेब यांची नवनिर्वाचित आमदार सुरेश अण्णा धस यांनी भेट घेत अभिनंदन केले.

यावेळी विक्रमी मताधिक्य घेत पाचव्यांदा आमदारपदी विराजमान झाल्याबद्दल सुरेश आण्णा धस यांचा फडणवीस साहेब यांनी सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. समवेत भाजपा नेते विधानपरिषद आ.राम शिंदे साहेब हे उपस्थित होते.

# संविधान दिनानिमित्त आज विविध कार्यक्रमांचे आयोजन

लातूर /प्रतिनिधी

भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सन २०२४-२५ या अमृत महोत्सवी वर्षात भारतीय राज्यघटनेबाबत जागरुकता तसेच संविधानाची मुल्ये शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच देशाचे भावी नागरीक यांच्यापर्यंत पोहचावीत, यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या अंतर्गत संविधाना दिनानिमित्त २६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ९ ते ११ या कालावधीत लातूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ वाजता संविधान रॅलीने या कार्यक्रमांना सुरुवात होणार आहे.

राज्यातील शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संकुले तसेच ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्था, महाराष्ट्र विधान परिषद, विधान सभा अशा सर्व ठिकाणी संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ अंतर्गत 'घर घर संविधान' उपक्रम साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी सकाळी ९ ते ११ दरम्यान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे संविधान प्रास्ताविकेचे वाचन करुन शहरातून शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संविधान रॅली काढण्यात येणार आहे.

संविधान रॅलीचे उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते होणार असून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, यावेळी उपस्थित राहणार आहे. तरी या रॅलीस सर्व नागरिकांनी उपस्थित राहण्याचे अवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त एस. एन. चिकुर्ते यांनी केले आहे.

# २६/११ शहिदांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आज परळीत रक्तदान शिबिर




परळी । प्रतिनिधी

२६/११ मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रध्दांजली म्हणून येथील कृष्णतेज सामाजिक प्रतिष्ठानने रक्तदान शिबीर आयोजित केले असून या शिबिरात अधिकाधिक युवकांनी रक्तदान करावे असे आवाहन करण्यात आले आहे.मंगळवार, दि.२६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वा.उपजिल्हा रुग्णालय, परळी वैजनाथ येथे सदरील शिबीर होत असून या शिबिरातील रक्तसंकलनासाठी शासकीय रक्तपेढी अंबाजोगाई येथील पथक येणार आहे तरी शहर व परिसरातील रक्तदात्यांनी या शिबिरात रक्तदान करून या राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे असे आवाहन कृष्णतेज सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे. कृष्णतेज सामाजिक प्रतिष्ठानचा उपक्रम उपजिल्हा रुग्णालयात होणार रक्तदान शासकीय रक्तपेढी अंबाजोगाईचे रक्तसंकलन

# १८ आरोग्य संस्थांच्या इमारतीमध्ये अग्निरोधक यंत्रणेसाठीच्या ३३ कोटी ३१ लाख रुपयांचे प्रस्ताव ३ वर्षांपासून धुळखात पडुन

## कार्डियाक कॅथलॅब सुविधेसाठी लक्ष्यवेधी शेकोटी आंदोलन:-डॉ.गणेश ढवळे

बीड (प्रतिनिधी)

जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयासह अधिनिस्थ इतर १७ अशा एकुण १८ आरोग्य संस्थांच्या इमारतीमध्ये अग्निरोधक यंत्रणेसाठीच्या ३३ कोटी ३१ लाख रुपयांचे प्रस्ताव ३ वर्षांपासून धुळखात पडुन असुन त्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्यात यावा तसेच जिल्हा रुग्णालयात एमआरआय,कार्डिअक कॅथलॅब सुविधा तातडीने उपलब्ध करावी तसेच माता- बालरुग्णालयाची ईमारत वापरात आणावी या विविध आरोग्य विषयक मागण्यांकडे जिल्हा व आरोग्य प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२५ सोमवार रोजी बीड जिल्ह्य रूग्णालय आवारात गेल्यावर्षी डॉ . अशोक बडे,जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांनी पाठवलेल्या धुळखात पडलेल्या प्रस्तावाची होळी करून निषेध व्यक्त करण्यासाठी लक्ष्यवेधी शेकोटी आंदोलन करण्यात आले. निवेदन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांना देण्यात आले. वरिष्ठांना संबंधित प्रकरणात पत्रव्यवहार केल्याचे लेखी डॉ. अशोक थोरात यांनी दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

यावेळी आंदोलनात शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार,मुबीन शेख , रामधन जमाले बीड जिल्हाध्यक्ष ( इंटक)आदी सहभागी होते.रूग्णालयातील इमारतींसाठी अग्निरोधक यंत्रणेसाठी ३३ कोटी ३१ लाख रूपयांच्या निधीची तरतूद करावी

बीड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयासह अधिनस्थ ईतर १७ अशा एकुण १८ आरोग्य संस्थांच्या इमारतीमध्ये अग्निरोधक बसविण्यासाठी जिल्हा रुग्णालय प्रशासनाने शासनाला मार्च २०२२ मध्ये ३३ कोटी ३१ लाख रुपयांचे अंदाजपत्रक पाठवत निधी आवश्यक असल्याने निधीची मागणी केली.या घटनेला ३ वर्षे उलटुनही निधी देण्याबाबत शासन स्तरावरून कुठल्याच हालचाली झाल्या नाहीत.तसेच जिल्हा नियोजन आयोगाकडून सुद्धा तरतूद करण्यात आली नाही.त्यामुळे शासन




जानेवारी २०२१ मध्ये भंडारा जिल्ह्यातील आणि नोव्हेंबर २०२१मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील रुग्णालयातील आगीच्या घटनेसारखी वाट पहात आहे का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.बीड जिल्हा रुग्णालयाची स्थापना १९५० साली होऊनही रूग्णालयाला आता ७५ वर्षे होऊनही मेंदुतील ताप, शरीरातील धमन्या, अपघातात मेंदू व शरीरांतर्गत तपासणी करण्यासाठी आवश्यक एमआरआय सुविधा उपलब्ध नसुन रूग्णांना खाजगी दवाखान्यात जाऊन आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असुन रूग्णांना बाहेरून तपासणी करुन आणण्यात गोल्डन आवर वाया जात असल्याने वेळेवर उपचार होत नाहीत त्यामुळे रूग्ण दगावु शकतो त्यामुळे बीड जिल्हा रुग्णालयात एमआरआय सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी.बीड जिल्हा रुग्णालयात कार्डियाक कॅथलॅब सुविधा उपलब्ध करण्यात यावी

जिल्ह्याच्या ठिकाणी कार्डियाक कॅथलॅब मंजुरीच्या घोषणा अनेकवेळा करण्यात आल्या.३ वर्षांपूर्वी शासनाने निर्णय देखील घेतला मात्र जागा, उपकरणे व तज्ञ यामुळे अद्याप मुहूर्त लागलाच नाही.हृद्यविकाराच्या रूग्णांना वेळेत उपचार मिळणे आवश्यक असते.मात्र कार्डियाक कॅथलॅब नसल्याने रूग्णांना खाजगी रुग्णालयात लाखो रुपये मोजावे लागतात किंवा मृत्युला कवटाळावे लागते त्यामुळे कार्डियाक कॅथलॅब सुविधा तातडीने उपलब्ध करण्यात यावी.जिल्हा बीड रूग्णालयासह अधिनस्त आरोग्य संस्थाकरीता अग्निरोधक यंत्रणेसाठी संस्थानिहाय लागणा-या अंदाजित खर्चाबाबत वरीष्ठ कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला आहे.एमआरआय साठी नविन वाढीव २०० खाटांच्या इमारतीमध्ये जागा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.तर कार्डियाक कॅथलॅब सुरू करण्यासाठी इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असुन मशीनरी व यंत्रसामग्री प्राप्त झालेल्या असुन काही दिवसातच कार्डियाक कॅथलॅब सुरू करण्यात येणार असल्याचे लेखी डॉ.अशोक थोरात जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांनी दिले.

# शिंदेंचे आमदार संतोष बांगर समर्थकांचा भाजप जिल्हाध्यक्षाच्या घरावर हल्ला

हिंगोली : शिवसेना आमदार संतोष बांगर यांच्या कार्यकर्त्यांनी भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष पप्पू चव्हाण यांच्या घरावर हल्ला करत त्यांच्यावर थेट तलवारीन वार केल्याचं समोर आलं आहे.

हल्ला करताना कार्यकर्त्यांकडे पिस्तुल असल्याचंही समोर आलं आहे. हिंगोली शहर पोलीस ठाण्यात बांगर यांच्या नातेवाईकासह ७० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मतमोजणीवेळी भाजप कार्यकर्ते आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली होती. त्यानंतर हा प्रकार घडला.



पप्पू चव्हाण यांच्या घराबाहेर उभ्या असलेल्या अनेक वाहनांची तोडफोड करण्यात आली आणि गोळीबारही करण्यात आल्याचं सांगण्यात येतं आहे. या घटनेत पप्पू चव्हाणच्या भावावर तलवारीने सपासप वार केल्यानं ते गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर हिंगोली येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दरम्यान, या घटनेत संतोष बांगर यांच्या पुतण्यासह काही जण गंभीर जखमी झाले आहेत. यातील काही लोकांवर नांदेडच्या रुग्णालयात तर काहींवर हैदराबादमध्ये उपचार सुरू आहेत. सध्या या घटनेनंतर पप्पू चव्हाणच्या तक्रारीवरून हिंगोली शहर पोलीस ठाण्यात आमदार संतोष बांगर यांच्या नातेवाईकांसह ७० कार्यकर्त्यांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे सर्व प्रकरण परस्पर वैमनस्यातून घडल्याचं सांगण्यात येतं आहे.

### तक्रारीमध्ये काय म्हटलंय?

आरोपींनी काही लोक जमवून घरावर हल्ला केला. घराबाहेर उभ्या असलेल्या वाहनांची तोडफोड केली. यावेळी एकूण ६०-७० मोटर सायकलींवर लोक आले होते. त्यांनी घराच्या काचाही फोडल्या. तसंच भाजप जिल्हाध्यक्षाच्या हातावर, मानेवर, डोक्यावर, पाठीवर गंभीर वार करुन त्यांना जखमी करण्यात आल्याचं सांगण्यात येतंय. सध्या हिंगोली शहरात निवडणूकपूर्व शांतता असून, या संपूर्ण प्रकरणाचा तपास पोलीस करत आहेत.

# देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री? अजित पवारही 'ओके'

मुंबई : महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकांमध्ये महायुतीनं घवघवीत यश मिळवलं आहे. अशातच आता तिढा आहे मुख्यमंत्रीपदाचा. मुख्यमंत्रीपदी कोण यावर सध्या महायुतीत खलबतं सुरू आहेत. अशातच आता देवेंद्र फडणवीसांचं नाव आघाडीवर असल्याची माहिती मिळत आहे.

राज्याच्या विधानसभा निकालानं सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे. महाराष्ट्राच्या जनतेनं महायुतीच्या बाजून कौल दिला. मतदार राजानं अगदी भरभरून मतांचं दान महायुतीच्या पदरात टाकलं. अशातच आता तिढा आहे तो म्हणजे, मुख्यमंत्रीपदाचा. राज्याच्या सत्तेची चावी तर महायुतीला मिळाली, पण मुख्यमंत्री पदी कोण विराजमान होणार? हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. पण सध्या मुख्यमंत्री पदाचा चेहरा भाजपचाच असणार, अशी माहिती विश्वसनिय सुत्रांनी एबीपी माझाला दिली आहे. अशातच महायुतीतला तिसरा मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून देवेंद्र फडणवीसांच्या नावाला पसंती दर्शवली आहे. तसा ठरावही राष्ट्रवादीचे सर्व मंत्री करणार असल्याची माहिती मिळत आहे. तर दुसरीकडे आरएसएसनंही देवेंद्र फडणवीसांच्या नावाला ग्रीन सिग्नल दिल्याची माहिती मिळत आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजप आणि महायुतीला प्रचंड बहुमत मिळाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला मुख्यमंत्रीपदी आरएसएस आणि भाजप हायकमांडची पसंती असल्याची माहिती समोर येत आहे. विश्वसनिय सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भाजप कार्यकर्त्यांच्या मोठ्या पाठिंब्यासोबतच फडणवीस यांच्या नावाला महायुतीतूनही पाठिंबा मिळत असल्याचं दिसत आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनं देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला आक्षेप नसल्याचं जाहीर करुन टाकलं आहे.

# यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे शानदार उदघाटन

## विचार आणि आचार संकुचित होणा-या काळात यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांची गरज

अंबाजोगाई (प्रतिनिधी)विचार आणि आचार संकुचित होणा-या काळात यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांची गरज आहे असे मत गांधीवादी विचारवंत तुषार गांधी यांनी व्यक्त केले.

येथील वेणुताई चव्हाण महाविद्यालयाच्या प्रांगणात यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ३ दिवसीय यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे उदघाटक म्हणून तुषार गांधी बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी प्रख्यात सिनेअभिनेते तथा चित्रपट व मालिकांचे दिग्दर्शक किरण माने होते तर व्यासपीठावर यशवंतराव चव्हाण

स्मृती समारोह समितीचे सचीव दगडु लोमटे, उपाध्यक्ष डॉ. कमलाकर कांबळे उपस्थित होते.यावेळी बोलताना तुषार गांधी पुढे म्हणाले की, यशवंतराव चव्हाण यांच्या सारखी माणसं होवून गेली का नाही अशी शंका निर्माण होणाऱ्या परिस्थितीत यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृती जागृत करण्यासाठी अशा तीन दिवसीय समारोहाचे आयोजन करण्यात येते ही खुप समाधानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. यशवंतराव चव्हाण यांचा संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत खुप महत्वाचा वाटा आहे. महाराष्ट्राला पुरोगामी विचारांचा वारसा त्यांनी दिला. भारत चीन घ्या युद्धकाळात संरक्षणमंत्री म्हणून त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामाचा ही त्यांनी उल.लेख केला.आजच्या परिस्थितीत संपूर्ण देशभर संविधान विरोधी वातावरण निर्माण करण्याचे काम



किमी जण जाणीवपूर्वक करीत आहेत अशा परिस्थितीत याविरुद्ध सर्वांनी एकत्र आले पाहिजे असे आवाहन तुषार गांधी यांनी केले.या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्रख्यात सिने अभिनेता दिग्दर्शक किरण माने यांनी आपल्या भाषणात किरण माने यशवंतराव चव्हाण यांच्या अंत्यसंस्कारासाठी मला उपस्थित राहता आले हे माझं भाग्य. यशवंतराव चव्हाण हे गोरगरीब, शोषीत दलीत यांच्या उध्दारासाठी झटणारे नेते होते. वयाच्या १९ व्या वर्षी त्यांनी देवराष्ट्र या गावात असपृशांसाठी शाळा महर्षी वि. रा. शिंदे यांच्या हस्ते सुरू केली.

यशवंतराव चव्हाण हे समाजकारणातुन राजकारणात आले. आमदार झाले, मंत्री झाले, मुख्यमंत्री, उपपंतप्रधान झाले. सत्तेचा कैफ आपल्या डोक्यात न जावू देणारा हा नेता होता.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचा मोठा वाटा असला तरी निर्मितीनंतर संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत आपला काहीही सहभाग नाही हे ठासून सांगणारा हा नेता होता. यशवंतराव चव्हाण हे तरल संवेदनशीलता, समाजभान, गरीबांची जाण असलेला नेता होता. अशा या थोर माणसांच्या विचारांचा जागर होणार महाराष्ट्रातील अंबाजोगाई हे एकमेव गाव असल्याचा आपल्या अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले.प्रारंभी दीपप्रज्वलन व यशवंतराव चव्हाण, व स्व.भगवानराव लोमटे यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. प्रारंभी कार्यक्रमाचे प्रस्ताविक यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह समितीचे सचीव दगडू लोमटे यांनी केले. आपल्या प्रास्ताविक त्यांनी या समारोहाची सुरवात ३९ वर्षापुर्वी या समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष स्व.श्री. भगवानरावजी लोमटे उर्फ बापू, भगवानराव शिंदे व त्यांच्या सहका-यांनी महाराष्ट्राचे शिल्पकार तथा पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरराव चव्हाण यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी केली. सुसंस्कृत महाराष्ट्राच्या निर्मिती साठी यशवंतराव चव्हाण यांना अभिप्रेत असणाऱ्या साहित्य, कला-संगीत, कृषी आणि युवा शक्ती यांची सांगड घालत यासर्व बाबींची माहिती या तीन दिवसीय यशवंराव चव्हाण स्मृती समारोहात देण्यात येते.

# कर्करोग रुग्णांसाठी आयुर्वेदिक उपचार, तंदुरुस्ती आणि आशेचा प्रवास

## इंटास फाउंडेशनचा अभिनव उपक्रम

मुंबई ।प्रतिनिधी

कर्करोगाशी सामना करत असलेल्या रुग्णांसाठी आणि त्यांच्या काळजीवाहकांसाठी इंटास फाउंडेशनने अपना घर मुंबई येथे एक विशेष सत्र आयोजित केले. या सत्रात आयुर्वेदिक उपचार, पंचकर्म पद्धती, आणि शारीरिक तंदुरुस्ती यावर आधारित माहिती व प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. या उपक्रमाचा मुख्य उद्देश रुग्णांच्या शारीरिक वेदनांवर उपाय सांगणे, मानसिक स्वास्थ्य सुधारणे आणि काळजीवाहकांना योग्य मार्गदर्शन देणे हा होता.

कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. संदेश मारेवाड (श्री हॉस्पिटल) उपस्थित होते. त्यांनी पंचकर्म उपचार पद्धतींवर सखोल मार्गदर्शन करत याचे फायदे स्पष्ट केले. पंचकर्मातील विविध प्रकार - वमन, विरेचन, बस्ती, रक्तमोक्षण, आणि नस्य - याबाबतची माहिती त्यांनी दिली. तसेच रुग्णांसाठी पाठदुखी, मानदुखी, आणि हाडदुखी यांसारख्या समस्यांवर उपाय म्हणून मसाज पद्धतींचे प्रात्यक्षिक दाखवले. तिळाच्या तेलाचा वापर, योग्य व्यायाम पद्धती, आणि पंचकर्म उपचारांचा कर्करोग रुग्णांवरील सकारात्मक



परिणाम याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. रुग्ण आणि काळजीवाहकांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देत त्यांनी सर्व शंकांचे निरसन केले.

सत्रादरम्यान प्रकल्प सहायक अमित घायाळ यांनी रुग्णांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक दृष्टिकोनाचा कसा उपयोग होतो, यावर भर दिला. उपचार प्रक्रियेदरम्यान शारीरिक सक्रियता आणि मानसिक बळाचे महत्त्व त्यांनी उलगडून दाखवले. रुग्णांच्या क्रियाशीलतेला चालना देण्यासाठी त्यांनी उपयुक्त सल्ला दिला.या सत्रात मुंबई विद्यापीठाच्या समाजकार्य विभागातील विद्यार्थिनी दामिनी बडगुजर आणि उज्वला माने, तसेच अपना घर येथे उपस्थित असलेले रुग्ण आणि काळजीवाहक सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी रुग्ण आणि काळजीवाहकांशी संवाद साधून त्यांचे अनुभव जाणून घेतले आणि सत्र अधिक माहितीपूर्ण केले.

सत्रादरम्यान उपस्थित रुग्ण, काळजीवाहक, आणि विद्यार्थ्यांनी पंचकर्म उपचारांच्या फायद्यांबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला. शारीरिक वेदनांमध्ये आराम आणि मानसिक स्थैर्य याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.अपना घर हे इंटास फाउंडेशनचे एक महत्त्वाचे केंद्र असून, ते कर्करोग रुग्ण आणि काळजीवाहकांसाठी मोफत निवास, भोजन, आणि प्रवास सुविधा पुरवते. शांत, स्वच्छ, आणि सकारात्मक वातावरणामुळे रुग्णांना उपचार प्रक्रियेत मानसिक आणि शारीरिक आधार मिळतो. अनेक रुग्णांनी या केंद्राच्या सोयीसुविधांबद्दल तसेच इथल्या वातावरणाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

इंटास फाउंडेशनच्या या उपक्रमामुळे कर्करोग रुग्ण आणि काळजीवाहकांना आयुर्वेदिक उपचारांबाबत नवीन माहिती मिळाली. तसेच त्यांनी आशेचा नवा किरण अनुभवला. सत्रादरम्यान रुग्णांनी आणि विद्यार्थ्यांनी एकत्रित सहभाग घेतल्यामुळे संवाद अधिक समृद्ध झाला.



धनंजय मुंडे यांनी आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन महायुतीच्या ऐतिहासिक विजयाबद्दल श्री फडणवीस यांच्या सत्कार करून अभिनंदन केले. मात्र, फडणवीस यांनी परळीसह बीड जिल्ह्यातील युतीच्या महाविजयाबद्दल 'माझ्या घरी आलात तर माझा नियम चालणार, यार तुम्ही विरोधकांना काहीच ठेवलं नाही, ग्रेट...' असे म्हणत आधी धनंजय मुंडे यांचा सत्कार करत महायुतीच्या बीड जिल्ह्यातील परळीसह महाविजयाबद्दल अभिनंदन केले व पाठीवर कौतुकाची थाप मारली...

# रानमळ्यात लोकसहभागातून उभारला वनराई बंधारा

गेवराई ।प्रतिनिधी

तालुका कृषी अधिकारी कार्यालय, गेवराई अंतर्गत मंडळ कृषी अधिकारी व रानमळा येथील ग्रामस्थांच्या लोकसहभागातून वनराई बंधारा उभारण्यात आला आहे. यामुळे परिसरातील विहीर, बोअरवेलच्या पाणी पातळीत वाढ होणार असून शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील पिकांना पाणी देण्यासाठी यांचा उपयोग होणार आहे.

तालुका कृषी अधिकारी कार्यालय गेवराई अंतर्गत मंडळ कृषी अधिकारी गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली रानमळा येथील ग्रामस्थांच्या लोकसहभागातून वनराई बंधारा बांधण्यात आला. या वनराई बंधाऱ्यामुळे पाण्याचा प्रवाह आडवला जातो. यामुळे पाणी जमिनीमध्ये मुरल्यामुळे आजूबाजूच्या विहीर, बोअरवेल यांच्या पाणी पातळीमध्ये वाढ होते व त्याचा रब्बी हंगामातील पिकांना सिंचनासाठी उपयोग होतो. वनराई बंधारा करण्यासाठी गेवराई येथील तालुका




कृषी अधिकारी कार्यालयाचे कृषी पर्यवेक्षक लहू चव्हाण, तुकाराम मुळक, कृषी मित्र पत्रकार वैजीनाथ जाधव, नारायण जाधव, अश्रूबा भोरे , रामेश्वर जाधव, गोपाळ हिंगे, अर्जुन वाघ सह आदी ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

उन्हाळ्याची चाहूल लागताच पाण्याचे स्त्रोत तळ गाठतात. त्यामुळे वनराई बंधारे शेतकर्यांसह पशु-पक्ष्यांसाठी वरदान ठरत आहेत. नदी - नाला येथे वाहत्या पाण्याच्या ठिकाणी सिमेंटच्या गोणींमध्ये माती भरुन बंधार्यांची निर्मिती केली तर पाण्याच्या पातळीत वाढ होऊन यातून पुढील अनेक दिवस गुराढोरांची तहान भागविली जाते. शेतकर्यांना शेती करणे देखील सोयीचे होऊन त्यातून चांगली पीके घेता येतात.

# ३ डिसेंबर रोजी राज्यात पत्रकार आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन : १०,००० पत्रकारांची होणार आरोग्य तपासणी

मुंबई ।प्रतिनिधी

३ डिसेंबर १९३९ रोजी मराठी पत्रकार परिषदेची मुंबईत स्थापना झाली.. मराठी पत्रकार परिषदेचा हा स्थापना दिवस राज्यात गेली दहा वर्षे पत्रकार आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो..या दिवशी स्थानिक डॉक्टर्सच्या मदतीने पत्रकारांच्या आरोग्याची तपासणी करून त्यांच्यावर प्राथमिक उपचार केले जातात.. गंभीर आजाराचा रूग्ण सापडल्यास त्यास मुंबईस पाठवून त्याच्यावर उपचार केले जातात.. गेल्या वर्षी पत्रकार आरोग्य तपासणी शिबिरांना राज्यात उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.. राज्यातील २६५ तालुक्यात ही शिबिरं झाली.. त्यात १०,००० पेक्षा जास्त पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबियांची आरोग्य तपासणी करण्यात आली.. हा जागतिक विक्रम होता..दरवर्षी प्रमाणे यंदा देखील मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिनी म्हणजे ३ डिसेंबर २०२४ रोजी राज्यात पत्रकार आरोग्य तपासणी शिबिरं घेण्यात येणार आहेत.. राज्यात ३५४ तालुके आहेत या सर्व तालुक्यात पत्रकार आरोग्य तपासणी




शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.. स्थानिक पत्रकारांनी पुढाकार घेऊन ही शिबिरं यशस्वी करावीत असं आवाहन एस.एम देशमुख यांनी केलं आहे..पत्रकारांचं आयुष्य दगदगीचं असतं.. जागरण, अवेळी जेवण, तणाव या सर्वांचा पत्रकारांच्या प्रकृतीवर परिणाम होत असतो.. मात्र हे दुखणे अनेकदा अंगावर काढले जाते.. विषय हाताबाहेर जातो तेव्हा वेळ निघून गेलेली असते.. अशी वेळ कोणत्याच पत्रकारावर येऊ नये यासाठी मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने दरवर्षी आरोग्य तपासणी केली जाते.. .. त्यासाठीच ही शिबिरं होत आहेत.. स्थानिक पातळीवर सर्व पत्रकारांनी एकत्र येत शिबिरं यशस्वी करावीत असं आवाहन परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम देशमुख, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई, राज्य प्रसिध्दीप्रमूख संदीप कुलकर्णी यांनी केले आहे.